# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माऊली शिक्षण प्रसारक मंडळातर्फे विज्ञान प्रदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ डिसेंबर :** आंबेजोगाई रोडवरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचालित माऊली बालक मंदिर, माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल येथे दोन दिवसीय प्रकल्प व विज्ञान प्रदर्शन आयोजित केले आहे.

या प्रकल्प प्रदर्शनाचे उद्घाटन कलावंत बेंबडे ज्ञानेश्वर यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष तोगरे अशोक हे होते.

दोन्ही मान्यवरांनी उपस्थितांना उपयुक्त मार्गदर्शन केले व संस्थेच्या सृजनशील उपक्रमांचे भरभरून कौतुक केले. या प्रकल्प प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण तिरुपती दर्शन देखावा हे ठरले. या प्रकल्प प्रदर्शनात विद्यालयातील चिमुकल्या चित्रकारांनी साकारलेल्या कलाकृती, आर्ट इमोशन कलादालनात प्रदर्शित करण्यात आल्या. तसेच या प्रकल्प प्रदर्शनामध्ये विविध विज्ञान प्रयोग विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले. यामध्ये प्लाझ्मा गन, फायर अलार्म, लाय फाय टैक्नोलौजी अशा विविध नाविन्यपूर्ण प्रयोगांचा समावेश होता. तसेच प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी समाज प्रबोधनात्मक रांगोळीतून सतयुग आणि कलयुग दर्शविण्यात आले.



# भाजपमध्ये आजही अनेक निष्ठावंत लाभाच्या पदापासून वंचितच!

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, ६ डिसेंबर :** आजघडीला भारतीय जनता पार्टी हा देशातील क्रमांक एकचा राजकीय पक्ष आहे. जगातील सर्वाधिक सदस्य संख्या असणारा सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणूनही भाजपाने आपले स्थान निर्माण केले आहे. असे असले तरी स्थानिक-जिल्हा पातळीवरील अनेक निष्ठावंत कार्यकर्ते-पदाधिकारी आजही लाभाच्या पदापासून वंचित असल्याचे निदर्शनास येते. या बाबीकडे भाजपच्या शीर्ष नेतृत्वाने कटाक्षाने पाहणे गरजेचे असल्याच्या प्रतिक्रिया वर्षानुवर्षे भाजपशी नाळ जुळलेल्या निष्ठावंतांकडून ऐकावयास मिळत आहेत.

भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करणाऱ्या अन्य राजकीय पक्षातील नेते-पदाधिकाऱ्यांची संख्या सध्या कमालीची वाढल्याचे पाहावयास मिळते. वर्षानुवर्षे ज्या राजकीय पक्षात कार्यरत होते, त्या पक्षाच्या पडत्या काळात आपल्या अपेक्षा पूर्ण होत नसल्याचे दिसताच पक्षत्याग करून भाजपात येणाऱ्यांची काही कमी नाही. अशा राजकीय पक्षातील नेते-पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश देताना त्यांच्या पूर्वायुष्यातील कार्यावर भाजपाच्याही वरिष्ठ नेत्यांनी संक्षिप्त कटाक्ष टाकणे आवश्यक आहे. अन्यथा कोणीही उठून आपल्या पक्षात येतोय म्हणून त्यांना लगेच प्रवेश देणे उचित ठरणार नाही, अशा भावनिक प्रतिक्रियाही सामान्यांसह निष्ठावंतांकडून व्यक्त होत असलेल्या दिसून येतात. याच कारणावरून काही मंडळी भाजपाला उपहासाने 'वॉशिंग मशिन'असेही संबोधताना आढळून येतात.

भाजपच्याच नेत्यांनी कधीकाळी अन्य राजकीय पक्षात असलेल्या नेत्यांवर मनसोक्त तोंडसुख घेताना अनेकांवर कठोर कार्यवाहीची भाषा केल्याचे स्मरणात आहे. मात्र, तीच मंडळी स्वतःहून भाजपमध्ये डेरेदाखल झाली की, त्यांच्यावर तोंडसुखा ऐवजी स्तुतीसुमने उधळली जाताना दिसतात. त्यामुळेही आजची भाजप अटलजींच्या तत्वावर चालणारी नाही, असे धाडसाने बोलले जाते. एवढेच नाही तर भाजपाची खूप कमी वेळात काँग्रेस झालीय, काँग्रेसच काय, आजच्या भाजपाने काँग्रेसलाही वेगाने मागे सोडलेय अशा विविधांगी उपरोधात्मक प्रतिक्रिया ऐकायला मिळतात. आज भाजपा देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष आहे. या पक्षात सहभागी होणाऱ्या, सामील होणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत आहे. पण पक्षात सहभागी होण्याची अभिलाषा प्रत्येकाने केवळ सत्तेच्या लाभाचा वाटा आपल्यापर्यंतही यावा, अशीच बाळगल्याने दिसून येते. काहींनी आपल्यावरील कठोर कार्यवाहीचा बडगा टळावा म्हणूनही भाजपशी नाते जोडण्याचा प्रयत्न केला आहे, हेही तेवढेच खरे आहे. अशी मंडळी अखेरपर्यंत भाजपात टिकून राहतील का?, निःस्वार्थ भावनेने भाजपमध्ये येणाऱ्यांची संख्या किती आहे? अशा प्रश्नांची उत्तर क्षणाचाही विलंब न लावता देणे शक्य नाही. यावरूनच सर्वकाही लक्षात येते.

भाजपात प्रवेश केलेल्या अनेक पक्षासाठी नवखे असणाऱ्या नेत्यांकडे आमदारकी-खासदारकीसह सत्तेतील अनेक लाभाची पदे देण्यात आल्याचे तसेच अन्य कार्यकर्त्यांनाही चांगल्या पदावर सामावून घेण्यात आल्याचे पाहावयास मिळते. तर अगदी जनसंघापासून म्हणजे भाजपच्या स्थापनेच्या आधीपासून आजही विचारांशी बांधील असणाऱ्या निष्ठावंतांना वंचित ठेवले जात असल्याचे दृष्टीपथास येते. याकडे किमान आगामी काळात तरी वरिष्ठ नेत्यांनी गांभीर्याने पहावे, अशी अपेक्षा निष्ठावंतांकडून व्यक्त होताना दिसतात.

# कोष्टगावचा युवक नरहरी डाके 'केबीसी'मध्ये ठरला विजेता

**तभा वृत्तसेवा,**

**लातूर, ६ डिसेंबर :** रेणापूर तालुक्यातील कोष्टगावातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील नरहरी अंकुश डाके उर्फ 'आबा' यांनी 'कोण बनेगा करोडपती' या सुप्रसिद्ध ज्ञानस्पर्धेत आपल्या बुद्धिमत्ता आणि चिकाटीच्या जोरावर तब्बल २५ लाख रुपये, इलेक्ट्रिक स्कूटी, दोन वर्षे लागणारे गोवर्धन तूप, तसेच इतर आकर्षक पारितोषिके जिंकून संपूर्ण लातूर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

अत्यंत साध्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या नरहरी डाकेंच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न भाजीपाला, दूध विक्री आणि आठवडी बाजारातून अवघे ८ ते १० हजार रुपये एवढेच. कर्जबाजारीपणाने दबलेल्या या कुटुंबाने अनेक कठीण प्रसंग झेलले-कधी गोठ्यातील म्हशी विकाव्या लागल्या, तर कधी कर्ज फेडण्यासाठी पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र विकावे लागले. मात्र या साऱ्यावर मात करत नरहरी यांनी मोबाईल, युट्युबचा अभ्यासासाठी योग्य उपयोग करून घइउ मध्ये सहभागी होण्याचे स्वप्न साकार केले.

दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी अमिताभ बच्चन यांच्या सूत्रसंचालनाखाली झालेल्या थेट प्रक्षेपणात नरहरी यांचा उत्साह, आत्मविश्र्वास आणि ज्ञानाचा थरारक खेळ पाहून संपूर्ण सभागृह भावूक झाले.




त्यांच्या संघर्षमय आयुष्याची कहाणी ऐकून बिग बी सुद्धा काही काळ स्तब्ध झाले.

या उल्लेखनीय यशानंतर कोष्टगाव, रेणापूर तसेच लातूर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. अविनाश डाके यांच्या घरी काशीलिंगेश्वर नगर, अंबाजोगाई रोड येथे आयोजित सामूहिक सत्कार कार्यक्रमात प्रा. जयपाल पाटील फड, प्रा. डॉ. केशव आलगुले, विठ्ठल कुरमुडे, माऊली घुले, राम मुंढे, धोंडीराम चिल्लरगे, पांडुरंग सपकाळ यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# लातूरमध्ये राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेचे थाटात उद्घाटन





**तभा वृत्तसेवा,**

**लातूर, ६ डिसेंबर :** शासन मान्यता प्राप्त ऑलिम्पिक क्रीडा प्रकारात तायक्कांदो या खेळाची ३५ वी वरिष्ठ गट महिला व पुरुष अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन लातूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. राज्यातून २८ जिल्ह्यातील ३२० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग झाले असून आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रुतीका टकले, शिवम शेट्टी, मृणाली हरणेकर यांचाही या स्पर्धेत सहभाग असून त्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

औसा रोड वरील जिल्हा क्रीडा संकुलात तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई यांच्या मान्यतेने तायक्कांदो असोसिएशन ऑफ लातूर यांच्या वतीने या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे , अशी माहिती जिल्हा संघटनेचे सचिव नेताजी जाधव यांनी दिली.

उद्घाटन प्रसंगी ॲड. किरण जाधव म्हणाले की, आजच्या युगात मुलं इलेक्ट्रॉनिक माध्यमात गुंतलेली आहेत, त्यांना मैदानावर आणणे आता शक्य होत नाही. त्यामुळे तायक्कांदो सारख्या मार्शल आर्ट खेळाची सवय बालवयापासूनच खेळाडूंना लावणे गरजेचे झाले असून यासाठी आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वात क्रीडाविषयक विशेष पावले उचलावी लागणार आहेत असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले आहे. तायक्कांदो या खेळाला आंतरराष्ट्रीय दर्जा असून शासकीय स्तरावर विविध फायदे खेळाडूंना मिळवता येतात. खेळाडूंनी मोठ्या संख्येवर तायक्कांदो या मार्शल आर्ट सारख्या स्व-संरक्षण करता येणाऱ्या खेळाकडे वळले पाहिजे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा तायक्कांदो राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. यावेळी बोधिसत्व विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्यासपीठावर प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या राज्यस्तरीय स्पर्धा दिनांक ५ डिसेंबर रोजी सुरू झाल्या असून त्याचा समारोप रविवारी दिनांक ७ डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे. याप्रसंगी तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाचे सहसचिव तथा स्पर्धा निरीक्षक मिलिंद पठारे यांची विशेष उपस्थिती होती.

राज्य संघटनेचे उपाध्यक्ष दुलीचंद मेश्राम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण बोरसे व सुभाष पाटील, मुंबई जिल्हा सचिव विजय कांबळे, कोल्हापूर जिल्हा सचिव कृष्णा जंगम, लातूर काँग्रेस मीडिया सेलचे प्रमुख प्रवीण सूर्यवंशी, लातूर मनपा माजी नगरसेवक गिरीश ब्याळे, धनाजी घाटे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते लाला भिल्लारे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना लातूर तायक्कांदो जिल्हा संघटनेचे सचिव तथा आशियाई तायक्कांदो प्रशिक्षक नेताजी जाधव यांनी केले तर आभार दुलीचंद मेश्राम यांनी व्यक्त केले.

स्पर्धा यशस्वीतेसाठी एस.व्ही. कुलकर्णी, धनश्री मदने, जान्हवी मदने, डॉ. दिपाली ममदे, भारती सुवर्णकार, विश्वजीत जाधव, आकाश मिरगे, गीतांजली नागरगोजे, रागिणी क्षीरसागर, अनुश्री कुलकर्णी आदी खेळाडू परिश्रम घेत आहेत.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीसह तिघांना पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**

**लातूर, ६ डिसेंबर :** लातूर शहरात एका अल्पवयीन मुलीवर शहरातील कॅफे शॉपमध्ये नेवून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आरोपीसह दोन कॅफे चालकांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी एका अल्पवयीन मुलीस अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासात महिला सहायक पोलीस निरीक्षक सुप्रिया केंद्रे यांनी तात्काळ अल्पवयीन मुलीचा शोध घेऊन तिच्याकडे विचारपूस केली असता तिने आरोपी रिहान गुलाब शेख (वय १८ वर्षे) याने जबरदस्तीने पळवून नेऊन खर्डेकर स्टॉप परिसरातील कॅफे डेली ग्रीन्डव एस.पी. कॅफे डेअर, खाडगाव टी पॉइंट जवळ, रिंग रोड लातूर या ठिकाणी नेऊन अत्याचार केल्याचाजबाब दिला. तपास अधिकारी समीरसिंह साळवे यांनी तपासा दरम्यान अल्पवयीन पिडीतेवर जबरी अत्याचार करणारा आरोपी रिहान गुलाब शेख, याला दि. ४ डिसेंबर रोजी अटक करून त्यांना दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला तसेच या अत्याचार प्रकरणी त्याला आपल्या कॅफेमध्ये जागा उपलब्ध करून साथ देणाऱ्या सुरज राजेश ढगे, एस.पी. कॅफे डेअर, अनिकेत अजय कोटुळे, कैफे डेली ग्रीन्ड यांनाही अटक करून न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने तिघांनाही दि. ८ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती सुप्रिया केंद्रे, सहा. पोलीस निरीक्षक, पोस्टे शिवाजी नगर व पोलीस अंमलदार महेश पारडे, गणेश मोरे, मिलींद कांबळे, पांडुरंग सगरे, राहुल क्षिरसागर, फॉरन्सीक टिमचे अर्जुन मुळे, श्रुती पंचगल्ले यांनी पार पाडली.

# विश्वरत्न डॉ. आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**

**लातूर, ६ डिसेंबर :** बहुजन उद्धारकर्ते, विश्वभूषण, विश्वरत्न, आधुनिक नवभारताचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात अत्यंत श्रद्धा आणि कृतज्ञतेच्या वातावरणात अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला. सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समितीच्यावतीने अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महामानव बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

यानंतर पु.भिक्खू संघाने उपस्थितांना त्रिसरण व पंचशील देऊन समाजातील नैतिकता, सामूहिक एकता आणि मानवतावादाचा संदेश दिला.

या प्रसंगी भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक नवभारताचे निर्माते आहेत. ६९ वर्षांपूर्वी त्यांचे महापरिनिर्वाण झाले आणि त्याक्षणी भारताने एक अद्वितीय प्रतिभा, तत्त्वज्ञ आणि जननायक गमावला. त्यांच्या जाण्याने वंचित, शोषित, पीडित समाज पोरका झाला. परंतु आजही त्यांचे संविधान आणि दिलेला बुद्ध धम्म ही आमची पिढ्यानपिढ्यांची शिदोरी आहे. ६ डिसेंबर हा दिवस प्रत्येकासाठी अत्यंत वेदनादायी असून, करोडो लोकांच्या मनावर आजही त्याचा खोल परिणाम जाणवतो. बाबासाहेबांचा संपूर्ण जीवनप्रवास हा केवळ एका व्यक्तीचा संघर्ष नव्हता, तर तो संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीचा दिव्य संदेश होता. त्यांनी आयुष्यभर शोषित, पीडित, वंचित समाजाला आवाज दिला,




स्वाभिमान दिला. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाने ६९ वर्षांपूर्वी देशाने एक युगप्रवर्तक विचारवंत गमावला, पण त्यांचे ध्येय, त्यांची तत्वनिष्ठा आणि मानवतावादी दृष्टी आजही अधिक तेजस्वीपणे मार्गदर्शक आहे.

या प्रसंगी भंते बोधिराज, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, शिक्षक आमदार विक्रम काळे, युवा नेते अजित पाटील कव्हेकर, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार महादेव चिकटे, डी. एस. नरसिंगे, प्रोफेसर डॉ. संजय गवई, भीमराव चौदंते, अनंत लांडगे, मोहन माने, चंद्रकांत चिकटे, राहुल कांबळे, ज्योतिराम लामतुरे, केशव कांबळे, विनय जाकते, वैभव गायकवाड, डॉ. विजय अजनिकर, चिंटू गायकवाड यांच्यासह बौद्ध उपासक उपासिकांनी उपस्थित राहून अभिवादन केले.

# लातूर शहर जिल्हा भाजपाकडून इच्छुकांच्या अर्ज स्विकृतीस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**

**लातूर, ६ डिसेंबर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका भाजपाकडून लढविण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारांचे अर्ज शहर जिल्हा भाजपाच्यावतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वीकारण्यास प्रारंभ करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि केंद्र व राज्यातील सरकार विकासाला गती देत प्रत्येक विकास योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी सक्षम काम करीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवत विरोधी पक्षातील अनेकजण भाजपाच्या विकास प्रवाहात सामील होत आहेत. यामुळे विरोधकांमध्ये नैराश्य आले असून या नैराश्याचे पराभवात रुपांतर करण्यासाठी पक्ष व पदाधिकार्यांनी आगामी काळात अहोरात्र मेहनत घ्यावी असे आवाहन लातूर भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीसाठी पक्षाकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक असणार्यांच्या अर्ज स्विकृतीस आजपासून प्रारंभ करण्यात आला. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर बोलत होते. याप्रसंगी निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, मनपाचे माजी गटनेते ॲड. शैलेश गोजमगुंडे, सरचिटणीस निखील गायकवाड, संजय गिर, रागिणी यादव, प्रविण कस्तुरे, प्रदेश कार्यकारणी सदस्य अविनाश कोळी, रवि सुडे, ॲड. प्रदिप मोरे, ॲड. दिग्वीजय काथवटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

लोकसभा व विधानसभा निवडणूकीत भाजपा महायुतीला मतदारांनी प्रचंड जनाधार देत बहुमताने सत्ता हाती दिल्याचे सांगत अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, सत्ता हे सेवेचे साधन आहे ही संकल्पना प्रत्यक्षात राबविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री




देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र व राज्य सरकार करीत आहे. सत्तेच्या माध्यमातून विकासाला गती देत विकासाच्या प्रत्येक योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी अविरत कार्य सुरु आहे. या कार्याला जनतेची साथ मिळत असून विकासाला गती देण्यासाठी भाजपच सक्षम आहे असे आता मतदाराकडून बोलले जाऊ लागले आहे. त्यामुळे आगामी महानगरपालिका निवडणूकीत पक्षाला मते देण्याकरीता लातूरकर इच्छुक आहेत मात्र आपण त्याच्यापर्यंत पोहचून त्यांच्याशी संवाद साधणे गरजेचे असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. विरोधकांमध्ये भाजपच्या विजयामुळे व विकासाच्या गतीमुळे नैराश्य निर्माण झाले आहे. या नैराश्यातूनच विरोधी पक्षातील अनेकजण भाजपच्या विकास प्रवाहात सामील होत असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी स्पष्ट केले.

**विरोधकांच्या नैराश्याचे पराभवात रुपांतर करा : अजित पाटील कव्हेकर**

विधानसभा निवडणूकीत निसटता विजय मिळविलेल्या विरोधकांना आता संपविण्यासाठी मनपा निवडणूक ही मोठी संधी असून या संधीचे सोने करण्याकरीता गट-तट, व्यक्तीद्वेष बाजुला ठेवत प्रत्येकाने कमळ हे उमेदवार समजून निवडणूकीच्या कामात झोकून द्यावे असे सांगत निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर म्हणाले की, स्वःबळावर निवडणूका लढवत शत्प्रतिशत विजय मिळविण्यासाठी आपण आगामी काळ पक्षासाठी द्यावा असे आवाहन केले.

या बैठकीचे सुत्रसंचलन रागिणी यादव तर आभार प्रदर्शन शैलेश गोजमगुंडे यांनी केले. निवडणूक लढविणार्या इच्छुकांसाठी गांधी चौक येथील पक्ष कार्यालयात सकाळी ११ ते दु. २ या वेळेत दि. ११ नोव्हेंबर पर्यंत अर्ज स्विकारले जाणार आहेत. इच्छुकांनी त्या-त्या मंडल अध्यक्षाकडून अर्ज घेऊन आपले अर्ज पक्ष कर्यालयात जमा करावेत असे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस मिना भोसले, मंडल अध्यक्षा निर्मला कांबळे, सुरेश जाधव, विशाल हवा पाटील, रोहित पाटील, राहुल भुतडा, शिवसिंह सिसोदिया, प्रमोद गुडे, उदय देशपांडे, ॲड. पंकज देशपांडे, व्यंकटेश कुलकर्णी, नितीन कोरे, ज्योती मार्तंडे, ॲड, किशोर शिंदे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...



### महापरिनिर्वाण दिनानिमित्त खिचडी वाटप

**छत्रपती संभाजीनगर :** महामानव परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर ला लाखो अनुयायांचा जात असतात. या वेळी छत्रपती संभाजीनगर येथे राजू शिंदे मित्रमंडळतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही खिचडी वाटप सेवा उपक्रम राबविण्यात आला. डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी निघालेल्या अनुयायांची सेवा करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सातत्याने आयोजित केला जातो. या प्रसंगी राजू शिंदे स्वतः उपस्थित राहून उपक्रमाचे निरीक्षण करत अनुयायांशी संवाद साधला. सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव जपण्याच्या उद्देशाने मित्रमंडळाने राबविलेली ही सेवा उपक्रम स्थानिक पातळीवर प्रशंसनीय ठरत आहे.

### डॉ. आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबीर




**गंगापूर :** महान विचारवंत आणि भारतीय घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर २०२५ रोजी गंगापूर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा न्यायाधीश गंगापूर एस.बी बहाळकर, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश एन.आर. इंदुलकर, सह दिवाणी वरिष्ठ स्तर आर.एल.पाठक, दुसरे सह दिवानी कनिष्ठ स्तर न्यायाधीश एम. ए.शेख, तिसरे सह दिवाने न्यायाधीश कनिष्ठ स्तर ए.ए. कळमकर, वकील संघ अध्यक्ष ॲड. किशोर कऱ्हाळे, उपाध्यक्ष ॲड. अमोल ठाकुर, सचिव ॲड. विठ्ठल काळे, ॲड. बी.आर.राजपूत, पि.बी. जोशी, व्ही. एस. मनोरकर, एस. के. नरोडे, ए.बी. कुलकर्णी, डि.व्ही.साबणे,जी.बी. चव्हाण, रविराज दारुंटे, एस.एन.साबणे, अमोल रासकर, शिवप्रसाद बनसोड, बी.एस.शिंदे, ए.एस. करडे, पी.डी. देशपांडे, सुनील सावंत, ए.एस. इंगळे, डि.ई. पानकडे, डि. के. तारू, संजय भोकरे, वाय.एन.जाधव, टि.व्ही.कोल्हे, आर. जी. बोठे, एम.डी.तांबे, एस.बी. शेख, महेश गुडदे, एम.पी. दारुंटे, पि.आर. बरडे, ए.आर. बरडे, अविनाश चव्हाण, सचिन मिसाळ, एस.पी.लबडे, एम.व्ही.कसाने, आर.जी.माघाडे, एम.एम.पवार, व्ही.जे.कसाने, एस.के.लांडे, अनंत खवले, महेंद्र राऊत, आकाश सिरसाठ, रोहण भालेराव, व्ही. जी. खाजेकर, आसिफ शहा, अमित बर्वे, दत्ताजी भाले, डॉ. मंजुषा कुलकर्णी, आप्पासाहेब सोमासे, गजानन वाघ, योगेश दहिवाल यावेळी उपस्थित होते.

### डॉ.बाबासाहेबांना निबंध लेखनातून अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागांतर्गत म. फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती व शेतकरी विषयक विचार या विषयावर स्पर्धा घेण्यात आली. प्राचार्य डॉ. आर. व्ही. मस्के यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीसे वितरित करण्यात आली. स्पर्धेत वर्षा प्रदीप आठवले (प्रथम), राशी अजय पंडित (द्वितीय), प्राची अविनाश काळे (तृतीय) यांनी क्रमांक पटकावले. सविता कैलकर, ज्योती मनोहर आणि कुमार प्रधान यांना उत्तेजनार्थ बक्षिसे मिळाली.

### स्विगीवर बिर्याणीच्या सर्वाधिक विक्रीचा नवा विक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील आघाडीचा ऑन-डिमांड कन्फिनियन्स प्लेटफॉर्म आणि मागील पाच वर्षांपासून स्विगीचा विश्र्वसनीय भागीदार असलेले सीएफसी शालीमार फॅमिली रेस्टॉरंट, यांनी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांच्या भागीदारीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा साजरा केला. दोघांनी मिळून १४ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान विशेष किंमतीत फक्त रु ३९ मध्ये चिकन बिर्याणीची खास ऑफर आणली. या धोरणात्मक सहकार्यामुळे विक्रीत विक्रमी वाढ झाली आणि केवळ तीन दिवसांत १५,०००+ बिर्याणी विकल्या गेल्या, जे मागील आठवड्याच्या तुलनेत ८००% वाढ दर्शवते. १४ नोव्हेंबरला छ. संभाजीनगरमध्ये टियर २ शहरातील एका दिवसात सर्वाधिक ६,००० बिर्याणी विक्रीचा नवा विक्रम नोंदवला.

### मेझॉन भारतासाठी खुले करत आहे एआय

**बंगळुरू :** सुलभ प्रवेश, उत्पादकता आणि डिजिटल समावेशन वाढवण्यासाठी भारत सरकारच्या एआय मिशनला पाठींबा देत मेझॉनने आज २०३० पर्यंत भारतातील लाखो लोकांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता पोहोचवण्याची योजना जाहीर केली. कंपनी स्थानिक क्लाऊड आणि एआय इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये १२.७ अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याच्या मार्गावर आहे आणि आपल्या विविध व्यवसायांद्वारे १५ दशलक्षपेक्षा जास्त लघु व्यवसायांना एआय चे लाभ मिळवून देईल. मेझॉनने २०३० पर्यंत शासकीय शाळांतील ४ दशलक्ष विद्यार्थ्यांपर्यंत एआय साक्षरता आणि करिअर जागरूकता पोहोचवण्याचेही आश्वासन दिले आहे.

### छत्रपती संभाजीनगरमध्ये नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटीच्या पहिल्या केंद्राचा शुभारंभ

**छत्रपती संभाजीनगर :** नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटीने नुकतेच छत्रपती संभाजीनगरमध्ये आपले पहिले केंद्र सुरू केले आहे. आज महाराष्ट्रात कोल्हापूर, मुंबई, नागपूर आणि पुणे याठिकाणी नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी सेंटर उपलब्ध आहे. छत्रपती संभाजीनगर केंद्रातील डॉक्टर सांगतात की आता पुरुषांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण वाढले आहे. आधी हे सुमारे ४०% होते, पण आता जवळजवळ ५०% पुरुषांना ही समस्या दिसत आहे. ही अडचण गावात आणि शहरात-दोन्हीकडे वाढताना दिसते. वाढते प्रदूषण आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे वंधत्वाची समस्या वाढत चालली आहे.

### महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

**सोयगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष वैशाली पवार यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सुरेश सरोदे, शंकर पगारे, राजेंद्र वाकेकर, विजय जाधव, योगेश बोखारे, राजू कुडके, शंकर जेठे, परमेश्वर राऊत, मनीषा जेठे, कृष्णा सुरडकर, शिवा निकम, ज्ञानेश्वर राऊत उपस्थित होते.

# भगवा शौर्य दिनानिमित्त शिवसेनेच्या वतीने महाआरती

**छत्रपती संभाजीनगर, दि.६ डिसेंबर :** भगवा शौर्य दिनानिमित्त शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज ६ डिसेंबर रोजी शहरातील गुलमंडी परिसरातील दुपारी हनुमान मंदिर येथे भजन व महाआरती करण्यात आली. राम मंदिर निर्माण आंदोलनातील शहिदांना यावेळी आदरांजली वाहण्यात आली.स्थानिक शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक व नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत कार्यक्रम अत्यंत भक्तिपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक श्रीराम व मारुती रायाच्या गजरात भजनाने झाली. कीर्तनकार व भजन मंडळांनी राष्ट्रधर्म, शिवछत्रपतींचे पराक्रम, आणि भगव्या विचारांचे गौरवगीत सादर करून वातावरण भारावून टाकले. जय भवानी, जय शिवाजी, शिवसेना जिंदाबाद या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. महाआरतीत सर्व उपस्थितांनी सामूहिक सहभाग घेतला.

**राम मंदिर निर्माण आंदोलनातील शहिदांना वाहिली आदरांजली**

पारंपरिक भजनांच्या गजरात व शंखनादात आरती पार पडताच संपूर्ण परिसरात भक्तिभाव व एकजुटीचा उत्साह पसरला.

भगवा शौर्याचा जागर, श्रीराम भक्तीचा गौरव आणि हिंदुत्वाचा अभिमान ज्वलंत करण्यासाठी तसेच राम मंदिर निर्माण आंदोलनातील शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी या आरतीचे



आयोजन करण्यात आल्याचे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे म्हणाले. भगवा शौर्य दिन हा आपला अभिमानाचा दिवस असून शिवचरित्र, हिंदू संस्कृती आणि महाराष्ट्राच्या परंपरांचे स्मरण करण्याचा हा दिवस आहे. समाजातील ऐक्य, बंधुता आणि शिवसेनेच्या विचारांची जपणूक हीच खरी सेवा असल्याचे शिवसेना नेते अंबादास दानवे म्हणाले.

कार्यक्रमात महिला आघाडी, युवासेना, अंगीकृत संघटना पदाधिकारी, शिवसैनिक तसेच मोठ्या संख्येने नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. भजन व महाआरतीनंतर प्रसादाचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील, सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, अनिल चोरडिया, महानगरप्रमुख राजू वैद्य, बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, ज्ञानेश्वर डांगे, दिग्विजय शेरखाने, महिला आघाडी संपर्क संघटिका सुनीता आऊलवार, सुनीता देव, अनिता मंत्री, दुर्गा भाटी, जिल्हा संघटक आशा दातार, महानगर संघटक सुकन्या भोसले व शहर संघटक सुनीता सोनवणे उपस्थित होते.

## एमजीएममध्ये ‘फूड कार्निवल’चे उत्साहात उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर, दि.६ डिसेंबर :** नववर्ष आणि ख्रिसमस यांना समोर ठेवत महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटतर्फे ‘फूड कार्निवल’ या खाद्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून एमजीएम सॉल्ट येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत या महोत्सवाचे उत्साहपूर्ण वाटवरणात उद्घाटन संपन्न झाले. हा महोत्सव दिनांक ५, ६ आणि ७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत हॉटेल सॉल्ट येथे असणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, सुप्रसिद्ध शेफ विष्णु मनोहर, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, संचालक डॉ. कपिलेश मंगल, शेप रुपेश भावसार, डॉ.पुष्पा गोरे, सर्व अधिष्ठाता,

**खाद्यप्रेमींना घेता येणार खाद्य संस्कृतीचा आस्वाद**

संचालक, प्राचार्य,विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या महोत्सवात विविध प्रदेशांच्या पदार्थांपासून संस्कृतीपर्यंत अनेक वैशिष्ट्यांचा समावेश असणार आहे. भव्य बुफे मेनूमध्ये स्टार्टरपासून ते डेझर्टपर्यंत तसेच विविध ॲकॉम्पनिमेंट्स समाविष्ट असणार आहे. या महोत्सवातील संपूर्ण तयारी यामध्ये जेवण तयार करण्यापासून ते अन्न-सेवा, पाहुण्यांची काळजी घेणे, लाईव्ह परफॉर्मन्स आणि इतर




मनोरंजन हे सर्व विद्यार्थी करणार आहेत. यासाठी त्यांना त्यांच्या प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले आहे.

स्विमिंग पूलच्या काठावर विशेष आकर्षणे, लाईव्ह काउंटर्स व इतर आकर्षणे सजविण्यात आली आहेत. या महोत्सवातील मुख्य आकर्षण अन्नाबरोबरच मनोरंजन देखील आहे, ज्यामध्ये संस्थेचे विद्यार्थी बँड परफॉर्मन्स सादर करतील. हा महोत्सव सर्वांसाठी खुला असून तिकिटे ‘द सॉल्ट’ व एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट येथे उपलब्ध आहेत.

## फुटवेअर दुकानाला आग; साडे तीन लाखाचे नुकसान

**बिडकीन, दि.६ डिसेंबर :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील भाजी मंडई मध्ये शुक्रवार रोजी सायंकाळी साडे सहाच्या सुमारास शिव फुटवेअर या कैलास अंकुश कवडे (वय २३ रा. काळे गल्ली बिडकीन) यांच्या चप्पल बुटाच्या दुकानाला शॉर्ट सर्किटमुळे अचानक दुकानाच्या मागे ठेवलेल्या रिकामे कागदी खोके, चप्पल बुटाचा साठा याने पेट घेतला. अचानक पाच ते दहा मिनिटात आगीचे लोळ दुकानाला विळख्यात घेऊनआगीचे भडके आल्याने भाजी मंडई परिसरात भीतीचे वातावरण पसरले.

भाजी विक्रेते तसेच आजुबाजूच्या व्यापाऱ्यांनी सर्व दुकाने बंद करून फुटवेअरच्या दुकानाला लागलेल्या आगीला विझविण्यासाठी स्थानिकांनी मिळेल तिथून बकेटने पाणी भरून आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत होते.या दुकानाला आग लागून जवळपास साडेतीन ते चार लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती दुकानचालक कैलास कवडे यांनी दिली. तसेच येथील डॉ. सुरेश जंगले यांनी त्यांच्या वरद हॉस्पीटलमधील दहा ते बारा आग विझविण्याचे फायर एक्स्टिंगुशर देऊन आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु आग इतकी भयंकर होती की, दुकानामधील सर्व फर्निचर सह चप्पल बुट जळून खाक झाले.



## ‘स्वरझंकार’ महोत्सवाच्या १५ व्या पर्वास प्रारंभ

**छत्रपती संभाजीनगर, दि.६ डिसेंबर :** शहराच्या सांस्कृतिक ब्रॅंड व्हॅल्यूला अधिक मजबुती देणाऱ्या ‘स्वरझंकार’ या अभिजात भारतीय शास्त्रीय संगीत महोत्सवाच्या १५व्या पर्वास दिमाखदार प्रारंभ झाला. व्हायोलिन अकादमी व एमआयटी कॅम्पस यांच्या संयुक्त विद्यमाने ५ ते ७ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या या तीन दिवसीय उपक्रमात रसिकांना दर्जेदार सांगीतिक अनुभव मिळतो आहे.

उद्घाटन सत्रात कथ्थक नृत्यांगना मौसमी जाजू यांनी कृष्णवंदना व ठुमरीतून प्रभावी नृत्याविष्कार सादर करत कार्यक्रमाची उंची ठरवली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सितारवादक पुर्बायन चॅटर्जी यांनी राग पटदिपमधील सादरीकरणातून शास्त्रीय संगीताची खोली अधोरेखित केली. सायंकाळच्या शिखर टप्प्यावर राष्ट्रीय पुरस्कार विजेते गायक राहुल देशपांडे यांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाचा प्रभाव बहुआयामी झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस पं. अतुलकुमार उपाध्ये यांनी मनोगत व्यक्त केले. संजीव ग्रुपचे जॉईंट डायरेक्टर शिवप्रसाद कामत यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

६ डिसेंबर रोजी विदुषी मंजुषा पाटील, ‘व्हायोलिन ट्रायो’ व पं. संजीव अभ्यंकर, तर ७ डिसेंबर रोजी भाग्येश मराठे, उस्ताद शुजात खान आणि आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या सादरीकरणाने महोत्सवाची सांगता होणार आहे. संजीव ग्रुप हा प्रमुख प्रायोजक असून, स्वरझंकारच्या माध्यमातून अभिजात संगीताचा सातत्यपूर्ण प्रचार-प्रसार होत आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये गोमांसाची तस्करी उधळली

**छत्रपती संभाजीनगर, दि.६ डिसेंबर :** अंबेलोहळ परिसरातून छत्रपती संभाजीनगर शहरात मोठ्या प्रमाणात गोमांस आणले जात असल्याची माहिती मिळताच विश्र्व हिंदू परिषद - बजरंग दलाच्या गोरक्षक दलाने संयुक्तपणे वाळूज परिसरातील रांजणगाव येथे सापळा रचून मोठी कारवाई केली.

गोरक्षा प्रमुख गणेश शेळके पाटील, प्रखंड सह संयोजक अभिषेक माने आणि प्रखंड गोरक्षा प्रमुख आकाश मेटे यांनी संशयित रिक्षाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात गोमांस आढळून आले.

घटना लक्षात येताच गोरक्षक दलाने तत्काळ पोलिस उपायुक्त अतुलकर यांना माहिती दिली. तस्करी रोखण्यासाठी ठोस पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचे गोरक्षकांच्या म्हणण्यात आले. या कारवाईनंतर वाळूज परिसरात स्थानिक गोरक्षक आणि नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले.

गोमांस पकडताना गोरक्षकांवर वारंवार हल्ले वाढत असल्याचा मुद्दा आंदोलनकर्त्यांनी जोरदारपणे मांडला. त्यांनी पोलिस प्रशासनाने तस्करांवर कठोर कारवाई करावी, गोरक्षकांचे संरक्षण सुनिश्र्चित करावे आणि संबंधित गुन्ह्यांवर तातडीने अंकुश आणावा, अशी मागणी केली.



## देवगडमध्ये भगवान दत्तात्रयांचा जन्मसोहळा उत्साहात

**गंगापूर, दि.५ डिसेंबर :** दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा अशा जयघोषासह पुष्पवृष्टी व शंखाचा निनाद करत नेवासा तालुक्यातील भू-लोकीचा स्वर्ग अशी ओळख असलेल्या गुरुदेव दत्तपीठ श्री क्षेत्र देवगड येथे गुरूवारी सायंकाळी ६ वाजता भगवान दत्तात्रयांचा जन्म सोहळा गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख राष्ट्रसंत गुरुवर्य महंत श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संत महंतांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

झालेल्या श्री दत्त जन्म सोहळयाच्या प्रसंगी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराजांच्या हस्ते भगवान दत्तात्रयांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. श्री दत्त जन्म सोहळयाच्या प्रसंगी मंदिरासमोरील कीर्तन मंडपात पुष्पांनी सजविलेल्या पुष्प मंडपात भगवान दत्तात्रयांची मूर्ती पाळण्यात ठेवण्यात आली होती. संत महंतांच्या हस्ते विधिवत पूजन झाल्यानंतर वेदमंत्राच्या जयघोष पुष्पवृष्टी करत भगवान दत्तात्रयांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला.



यावेळी गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज, उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज, प्रयागराज येथील स्वामी पंडितराज मिश्रा, महंत कैलासगिरी महाराज, महंत रमेशानंदगिरीजी महाराज, महंत आवेराज महाराज यांच्या हस्ते पाळण्याची दोरी ओढण्यात आली.नेवासा येथील गायिका सौ. माधुरीताई कुलकर्णी यांनी दत्त जन्माचा पाळणा म्हटला.

श्री दत्त जन्म सोहळयाच्या प्रसंगी स्वामी प्रकाशानंदगिरी च्या मातोश्री सौ.मीराबाई मते पाटील, महंत कैलासगिरीजी महाराज, महंत रमेशानंदगिरी महाराज, जनार्धन महाराज मेटे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालीनीताई विखे पाटील, नेवासाचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, माजी आमदार पांडुरंग अभंग, बाळासाहेब मुरकुटे, काशिनाथ नवले, अप्पा बारगजे, पोलीस निरीक्षक महेश पाटील, भाऊ नांगरे, अशोक तांबे, बाळासाहेब देवखिळे, विष्णूपंत ठोसर यांच्यासह हजारो भाविक उपस्थित होते.

## खरी कमाई-आनंद नगरी उपक्रमात उत्साहाची लाट

**सोयगाव, दि.६ डिसेंबर :** जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे व केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच दशसूत्री व आनंददायी शिक्षण उपक्रमाअंतर्गत, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या संकल्पनेतून खरी कमाई - आनंद नगरी हा उपक्रम भव्यदिव्य उत्साहात संपन्न झाला.

शनिवार, दि.६ शनिवार रोजी शाळेच्या प्रांगणात हा उपक्रम भरविण्यात आला.या कार्यक्रमाला पालक,गावकरी,माजी विद्यार्थी आणि मान्यवरांचा एवढा मोठा सहभाग होता की जणू काही गावात एखादा मोठा जत्रा-बाजार भरल्याचा भास होत होता. प्रचंड उत्साह, कौतुकाची दाद आणि विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे शाळा परिसर आनंदनगरीत परिवर्तित झाला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली विक्री-केंद्रे, कला-प्रदर्शने, खेळ स्टॉल, खाद्यपदार्थ, हातगुंतीच्या वस्तू,



छोटेखानी व्यवसाय, सेवा-केंद्रे, तिकीट पद्धतीचे व्यवहार अशा विविध उपक्रमांनी पालकांची मने जिंकली.

बँक ऑफ महाराष्ट्र सोयगाव शाखा व्यवस्थापक धीरज भुरे, सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा राधाबाई सोनवणे, सदस्य अण्णा वाघ, शालेय समिती सदस्य रंगनाथ लोखंडे, समाजसेवक कृष्णा पाटील, माजी विद्यार्थी संघ सदस्य राजू कुडके, समाजसेवक दत्त रोकडे, नगरसेवक हर्षल काळे, समाजसेवक राजेंद्र दुतोडे, समाजसेवक अंकुश पगारे, मुख्याध्यापक किरणकुमार पाटील होते.

या उपक्रमातून एकूण अंदाजे ३५,८७५ रुपये इतकी खरेदी-विक्री झाली. बाल आनंद मेळाव्यास पालकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोदवून त्यातही महीला पालकाचा सहभाग वाखाणण्याजोगा होता.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, पदवीधर शिक्षक सुरेखा चौधरी, पंकज रगडे, रामचंद्र महाकाळ, सहशिक्षक मंगला बोरसे, सविता पाटील, प्रतिभा कोळी, शेख विखार, बिलाल बागवान, अनिल देसाई, तानाजी चव्हाण, शुभम देसले, पुनम लाड यानी परिश्रम घेतले.

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब. क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्र.८०६/२०२५

अर्जदार :-१) सिंधुबाई दत्तु गावंडे, वय ६७ वर्गे भंदा. शेती, रा. मांगेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद. २) परिगाबाई बापूराव जेउपाले, वय ५६ वर्षे, धंदा. शेती, रा. सावखेडा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद. ३) पद्माबाई दत्तु पवार, वय ५४ वर्षे, भंदा. शेती, रा. बावरगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद.

विरूध्द गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन क्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप. प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. ए. एस. इंगळे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, लक्ष्मण गोपाळराव मोकळे हे बावरगाव ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि.२३/०५/२०२१ रोजी बाबरगांव ता. गंगापुर येथे मयत झाले तसेचअर्जदारांची आई नामे छबाबाई लक्ष्मण मोकळे ही देखील दि.०३/०२/२०२३ रोजी मौजे मागेगांव ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे.मयतांस केवळ अर्जदार क. १ ते ३ हि विवाहीत मुली असून या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही मयत छबाबाई लक्ष्मण मोकळे यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय व इतर कार्यालयात अर्जदार हे मयत छबाबाई लक्ष्मण मोकळे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारास हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारास करणे भाग पडले आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेलेविनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर.**

## अग्रलेख...

# फडणवीसांची आश्वासक वर्षपूर्ती

विकासाची जाण आणि त्यासाठी लागणारी दीर्घदृष्टी असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारला एक वर्ष पूर्ण झाले आहे. राज्यातील महायुती सरकारच्या वर्षपूर्तीचा अर्थात एका वर्षाचा हा काळ खूप मोठा नसला तरी तो राज्याला विकासाच्या मार्गावर नेणारा आहे आणि त्यामुळेच राज्यातील जनतेला अतिशय समाधान देणारा असा म्हणावा लागेल. देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्री म्हणून हा तसा दुसरा कार्यकाळ. याआधी २०१४ ते २०१९ या काळात फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाचा आपला पहिला पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला. मध्यंतरी बरेच काही घडले. मग, मागील वर्षी पाच डिसेंबरला फडणवीस यांनी हजारो लोकांच्या उपस्थितीत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. लोकनेता कसा असतो आणि कसा असावा, हे आपल्या कृतीतून फडणवीस यांनी सतत दाखवून दिले. २०१९ मध्ये पुन्हा एकदा फडणवीस मुख्यमंत्री होतील, असे सर्वांना वाटत होते. महाराष्ट्रातील मतदारांचा जनादेशही तसाच होता, पण काही अनपेक्षित राजकीय घडामोडींनी राजकारण बदलले. मुख्यमंत्रिपदापासून फडणवीस यांना दूर राहावे लागले. पण ते हताश आणि निराश झाले नाहीत. विरोधी पक्षनेते म्हणून नवी जबाबदारी पार पाडण्यासाठी फडणवीस सज्ज झाले आणि ती जबाबदारी त्यांनी अतिशय प्रभावीपणे आणि यशस्वीपणे पार पाडली. याचे कारण असे की, फडणवीस ज्या संस्कारातून आले, त्यात सत्ता हे साध्य नाही तर जनतेच्या सेवेचे साधन मानले जाते. त्यामुळे जनतेची सेवा करायला फडणवीसांसारख्या नेत्याला सत्तेची किंवा पदाची गरज नाही. सत्ता असेल तर सत्तेसह आणि सत्ता नसेल तर विरोधी पक्षात बसून जनतेची सेवा करायला फडणवीस यांच्यासारखे सुसंस्कृत नेते एका पायावर तयार असतात हे त्यांनी आतापर्यंत केलेल्या भूमिका सिद्ध करतात. राजकारणात येण्याच्या आधीपासून ते संघाचे स्वयंसेवक आहेत.

संघाने देशाला दोन पंतप्रधान दिले. योगायोगाने दोघेही कधीकाळी संघाचे प्रचारक होते. त्यामुळे पंतप्रधान म्हणून त्यांनी देशावर आपला ठसा उमटवला. देशात आतापर्यंत होऊन गेलेल्या इतर पंतप्रधानांचे काम आणि वाजपेयी-मोदी यांचे कार्य यातील फरक स्पष्ट दिसतो. एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदय या संकल्पनेचे वाजपेयी आणि मोदी हे दोघेही पाईक. अंत्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण. वाजपेयी आणि मोदी यांच्या सरकारची वाटचाल याच भूमिकेतून झाली आणि अजूनही सुरू आहे. वाजपेयी आणि मोदी यांना आदर्श मानूनच देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारची महाराष्ट्रातील वाटचाल सुरू आहे आणि अंत्योदय हे त्याचे उद्दिष्ट आहे. त्याचा अनुकूल परिणामही दिसून येत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या दुसऱ्या कारकीर्दीचा हा टप्पा वाटतो तितका सोपा नव्हता. यात त्यांना अनेक आव्हानांचा आणि अडचणींचा सामना करावा लागला. राजकीय तडजोडीत उपमुख्यमंत्रिपदही स्वीकारावे लागले. जी व्यक्ती आपल्या मंत्रिमंडळात सहकारी होती, तिचे नेतृत्व मुख्यमंत्री म्हणून मान्य करताना, त्या मंत्रिमंडळात त्यांना उपमुख्यमंत्री व्हावे लागले. खरं म्हणजे हे राजकीय अवमूल्यन होते. पण फडणवीस यांनी पक्षाच्या आणि राज्यातील जनतेच्या व्यापक आणि दीर्घकालीन हितासाठी हा कडू घोट पचवला. काही वेळेला राजकारणात माघार घ्यावी लागते, संयम बाळगावा लागतो. तुमच्या राजकीय कल्पना स्पष्ट असतील, आपण राजकारणात कशासाठी आलो, याबद्दल मनात कोणताही संभ्रम नसेल तर अशा घटना दिलेरीने घेता येतात. फडणवीस यांनी तेच केले. ज्या पदावर बसले, ते पद त्यांनी मोठे केले. आता मुख्यमंत्रिपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा कायापालट सुरू केला आहे. खरं म्हणजे याची सुरुवात त्यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळातच केली होती. त्यावेळी त्यांनी विकासाची जी बीजे टाकली होती, त्यांचा आता डेरेदार वृक्ष झाला आहे आणि त्याला फळेही येत आहेत. मुख्यमंत्रिपदाची दुसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर फडणवीस यांनी बदल्याचे नाही तर बदलाचे राजकारण करण्याचा शब्द दिला होता. त्या शब्दाची पूर्तता त्यांनी केली. सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्रात आज जे बदल दिसून येत आहेत, त्याचे श्रेय त्यांना द्यावे लागेल. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर फडणवीस यांनी राज्याच्या मागास, अतिमागास भागाकडे विशेष लक्ष दिले. गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त जिल्ह्याचे पालकमंत्रिपद स्वीकारले. या जिल्ह्याचे पालकमंत्री व्हायला अनेक नेते घाबरत होते, जबरदस्तीने पालकमंत्रिपद आले तर त्या जिल्ह्यात फिरकत नव्हते, चुकून जायची वेळ आली तर गडचिरोलीच्या बाहेर पडत नव्हते. पण ही परिस्थिती फडणवीस यांनी बदलली. गडचिरोलीचा विकास करायचा असेल तर त्या जिल्ह्यातील नक्षलवाद आटोक्यात आणला पाहिजे, संपवला पाहिजे, याची त्यांना जाणीव होती. त्या दिशेने त्यांनी पावले टाकली. नक्षलवाद संपवण्याच्या मोदी सरकारच्या आक्रमक धोरणाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केली. त्यांच्या दिशादर्शी कामामुळे महाराष्ट्रातील विशेषत: गडचिरोलीमधील नक्षलवाद आज शेवटचे आचके देत आहे. नक्षलवाद्यांना शरण येण्याचे आवाहन करण्यात आले. याचा परिणाम दिसून आला. अनेक कुख्यात नक्षलवाद्यांनी फडणवीस यांच्या उपस्थितीत शस्त्रे खाली ठेवत आत्मसमर्पण केले. ज्यांनी आत्मसमर्पण करण्यास नकार दिला, त्यांना गोळ्या घालण्याचा अधिकार त्यांनी पोलिसांना दिला आहे.

यामुळे गडचिरोलीसारख्या खनिज संपत्तीचे भांडार असलेल्या जिल्ह्यात अनेक मोठे उद्योग आले आणि अजून येत आहेत. यातून आदिवासी तरुणांच्या हाताला बंदुका नाही तर रोजगार मिळाला. कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आधीपासूनच आघाडीवर होते. ती आघाडी कायम आहे. राज्याचा जो औद्योगिक विकास झाला, त्यामागे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था स्थिती हे एक कारण होते. आरोग्य आणि शिक्षण यात महाराष्ट्र तर देशात आधीपासूनच आघाडीवरचे राज्य होते. फडणवीस यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक आली. यातून महाराष्ट्रात अनेक मोठ्या औद्योगिक समूहांचे उद्योग आले. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाले. तरुणांच्या हाताला काम मिळाले तर त्यांच्या हातात दगड आणि डोक्यात हिंसक विचार येत नाहीत.

फडणवीस यांच्या कार्यकाळात राज्यातील भ्रष्टाचार कमी झाला. मंत्र्यांना त्यांनी कामाला लावले. मंत्र्यांना आणि मंत्रालयांनाही लक्ष्य ठरवून दिले. एवढ्या दिवसांत एवढी कामे झाली पाहिजेत, असे बंधन घालून दिले. यातून मंत्र्यांसोबत प्रशासनातही जनतेप्रति उत्तरदायित्वाची भावना निर्माण केली. काँग्रेसच्या कार्यकाळात केंद्रापासून राज्यापर्यंतचे अनेक मंत्री जनतेला नाही तर काही मूठभर भांडवलदारांना उत्तरदायी राहात होते. त्यातून राज्यात अनागोंदी आणि भ्रष्टाचार वाढला होता. या सर्वांना फडणवीस यांनी आळा घातला. 'न खाउंगा न खाने दूंगा', या मोदींच्या पावलावर पाऊल टाकत फडणवीस यांची वाटचाल सुरू आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या कार्यकाळात सुरुवातीला देवेंद्र फडणवीस काहीसे नवखे होते. त्यामुळे प्रशासनावर पाहिजे तशी पकड बसवायला त्यांना वेळ लागला. आता मात्र प्रशासनरूपी नाठाळ घोड्याला फडणवीस यांनी वठणीवर आणले आहे. प्रशासनरूपी घोड्यावर त्यांची मांड पक्की बसली आहे. आता प्रशासन त्यांची फसवणूक करू शकत नाही, त्यांना चुकीचा सल्ला देऊ शकत नाही. फडणवीस उच्चशिक्षित आहेतच; शिवाय जनमानसावर त्यांची पकड आहे. भविष्यातील दमदार नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी महाराष्ट्र सर्व क्षेत्रांत पुढे जावा यासाठी काम केले व करीत आहेत. महाराष्ट्राच्या या घोडदौडीचे कारण फडणवीस यांच्या नेतृत्वात, कर्तृत्वात आणि वक्तृत्वात आहे. त्यामुळेच राजकारणात लंबी रेस का घोडा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. देवेंद्र फडणवीसांसारखा नेता महाराष्ट्राला मुख्यमंत्री म्हणून मिळाला, हे महाराष्ट्राचे भाग्य म्हटले पाहिजे. त्यामुळे महाराष्ट्राचा भाग्यविधाता म्हणूनही त्यांचा उल्लेख करायला हरकत नाही. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी अनंत शुभेच्छा!

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# कुंभ 'रोजगार' महामेळा



पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा बांधण्याची समाजकंटकांची जुनी रीत आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याबाबत सध्या सोशल मीडियावर बराच वादंग उठला आहे. साधू-संतांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत, कुंभ मेळ्याला 'अंधश्रद्धेचा मेळा' म्हणून हिणवले जात आहे आणि सर्वांत जास्त चर्चा आहे ती तपोवनातील काही झाडे तोडली जाणार असल्याच्या बातमीची. किती झाडे तोडली जाणार आहेत? अनावश्यक झाडे तोडली जाणार आहेत का? की पुनर्लागवड केली जाणार आहे? हे जाणून न घेता सरसकट टीका होत आहे. नाशिक महानगरपालिकेने तपोवन परिसरात साधुग्रामसाठी झाडे तोडण्याचा प्रस्ताव मांडला आहे. काही माध्यमांनी आणि पर्यावरणवाद्यांनी असा प्रचार केला की ''साधूंच्या तंबूसाठी हजारो झाडे तोडली जाणार आहेत''. राजकीय विरोधकांनीही यावर तीव्र विरोध केला आहे. चिपको चळवळी स्टाईल आंदोलने करण्याचा प्रयत्न होत आहे.

प्रत्यक्षात महाराष्ट्र सरकारने स्पष्ट केले आहे की एकही अनावश्यक झाड तोडले जाणार नाही. सरकारतर्फे असे सांगण्यात आले आहे की फक्त धोकादायक किंवा परकीय झाडे हटवली जातील आणि त्याऐवजी १ लाख हून अधिक नवीन झाडे लावली जातील. नाशिकमध्ये 'क्लीन गोदावरी' मोहीम सुरू आहे आणि 'ग्रीन कुंभ' म्हणून पर्यावरणाचे रक्षण करण्यावर भर आहे. पण ''साधूंसाठी झाडे तोडली'' हे नॅरेटिव्ह सोयीस्कररीत्या पसरवले गेले आहे. सामान्य लोकही यास भुलत आहेत हे दुर्दैव. यामध्ये एक गोष्ट लक्षात घ्या. सरकारवर टीका, रोष असणे, हे समजण्यासारखे आहे. जगभरात पर्यावरणप्रेमी आणि सरकारचा संघर्ष होतच राहतो आणि होत राहील. मात्र या आडून हिंदू साधू संतांवर, हिंदू परंपरेवर टीका सुरू झाली आहे. हा रोख आपण ओळखला पाहिजे.

प्रयागराज येथील कुंभमेळ्याबाबतही आपल्या परंपरांवर टीका झाली होती. तिथे येणाऱ्या सांधूसाठीही गलिच्छ भाषा वापरली गेली होती. कुंभ हा हिंदू संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. हजारो वर्षांची परंपरा आहे. अमृतमंथनावेळी चार ठिकाणी अमृताचे थेंब पडल्याची कथा आहे. त्याच ठिकाणी दर १२ वर्षांनी कुंभमेळा होतो. नाशिकमध्ये हा मेळा गोदावरी नदीच्या काठावर साजरा होतो. प्रयागराज येथील कुंभमेळ्यावर आपल्याकडचे महामूर्ख लोक टीका करत बसले होते आणि पवित्र स्नान करण्यासाठी जगभरातील बडे लोक, उद्योगपती आले आणि हिंदू संस्कृतीसमोर नतमस्तक झाले होते. हिंदू विरोधी इको-सिस्टिमचा डाव आपण ओळखला पाहिजे. सर्वसामान्य हिंदूंनी भाजपा या पक्षाला विरोध म्हणून किंवा नावडते सरकार म्हणून कुंभमेळ्यावर व हिंदू साधू संतांना नावे ठेवू नये.

दुसरी गोष्ट हिंदू सण, समारंभ, लग्न सोहळे, उत्सव यांत धार्मिक महत्त्व असतेच. पण त्यातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते. २०२५ मध्ये सुमारे ४० ते ४५ कोटी लोकांनी महाकुंभाला भेट दिली आहे. २०१९ मध्ये २४ कोटी लोक जमले होते. हे कोट्यवधी लोक मूर्ख आहेत म्हणून इथे येतात का? ज्यावेळी कोट्यवधी लोक एका ठिकाणी ४-५ महिन्यांसाठी येतात, तेव्हा तिथे रोजगाराचा एक प्रचंड महासागर तयार होतो. नाशिक कुंभासाठी देखील अशीच जय्यत तयारी सुरू आहे. कुंभमेळा म्हणजे जणू तात्पुरते आर्थिक शहरच! हे शहर चालवण्यासाठी लाखो लोकांना काम मिळते. प्रयागराज येथील २०२५ च्या महाकुंभामध्ये २ लाख कोटींची आर्थिक उलाढाल झाली. २०१३ मध्ये १२ हजार कोटी, २०१९ मध्ये १.२ लाख कोटींची आर्थिक उलाढाल झाली. प्रत्येक मेळ्यात लाखो भाविकांना सुविधा देण्यासाठी हजारो तात्पुरते कामगार पायाभूत सुविधा उभारतात. रस्ते, तंबू, प्रकाशयोजना, पाणीपुरवठा, स्वच्छतागृहे, सुरक्षा आणि आपत्कालीन सेवांचे जाळे उभे करण्यासाठी मोठी कामगिरी पार पाडली जाते. या सर्वांमध्ये मजूर, कारागीर, इलेक्ट्रिशियन, ड्रायव्हर्स, तात्पुरते कर्मचारी आणि स्वयंसेवकांना सतत रोजगार मिळतो. हॉटेल, ढाबे, गेस्ट हाऊस आणि होमस्टे यांनाही प्रचंड मागणी येत असल्याने स्थानिकांना अतिरिक्त उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध होतात. धार्मिक साहित्य जसे जपमाळा, रुद्राक्ष, देवांची प्रतिमा, पूजासाहित्य यांच्या विक्रीत अभूतपूर्व वाढ होते.

याशिवाय फुलवाले, मिठाई-नाश्ता विक्रेते, कपड्यांचे दुकानदार, हस्तकला विक्रेते, चित्रकार, फोटो-व्हिडीओ सेवा देणारे छोटे उद्योजक यांचा व्यवसाय काही आठवड्यांमध्ये वर्षभराचे उत्पन्न मिळवून देतो. मोठ्या कंपन्याही या गर्दीकडे मार्केटिंगची संधी म्हणून पाहतात. मोबाईल नेटवर्क, पेय पदार्थ, ई-कॉमर्स आणि वित्तीय सेवा देणाऱ्या कंपन्या स्टॉल्स, जाहिराती आणि सेवा केंद्रांद्वारे नवीन ग्राहक मिळवतात. आता तर सोशल मीडियावर रील्स, व्हिडीओ अपलोड करणाऱ्यांनाही कुंभ मेळ्यातून चांगले उत्पन्न होऊ लागले आहे. त्यामुळे कुंभ हा फक्त धार्मिक सोहळा नाही. खरं तर याकडे मोठी गुंतवणूक म्हणून पाहायला पाहिजे. अर्थकारणाचा महत्त्वाचा स्रोत म्हणून पाहिले पाहिजे. मेळा संपल्यानंतरही प्रभाव म्हणून पर्यटनाला चालना मिळत राहते. कारण अशा मेळ्यांमुळे ते विशिष्ट शहर अथवा गाव जागतिक पातळीवर अधिक प्रसिद्ध होते.

या सर्व गोष्टींचा विचार करता कुंभमेळ्यावर होणारी टीका किती दुर्दैवी आहे. जगातल्या कोणत्या सांस्कृतिक, धार्मिक कार्यात इतकी रोजगारनिर्मिती होते? अहो, आमचे दसरा, दिवाळी हे सण सुद्धा हजारो, लाखो लोकांना रोजगार मिळवून देतात. या नक्षली वृत्तींच्या लोकांना मंदिरातल्या भटजीची जात दिसते. या ढोंगी लोकांमध्ये सत्याचा सामना करण्याची धमक असेल तर मंदिराबाहेर हार विकणाऱ्या, नारळ विकणाऱ्या, गळ्यातले दोरे इत्यादी साहित्य विकणाऱ्या लोकांची जात विचारावी. म्हणजे कळेल की एक मंदिर किती तरी जणांचे, कितीतरी विविध जातीच्या लोकांचे घर चालवत असते. बऱ्याचदा हिंदू नसलेले लोकही हिंदू सणांवर, उत्सवांवर जगत असतात. प्रसिद्ध मंदिरांची कथा तर आणखी थोर आहे. झाडाला मिठ्या मारून ढोंग करणाऱ्यांमध्ये धमक आहे का असा रोजगार निर्माण करण्याची? लाखो लोकांना आध्यात्मिक अनुभूती देणारा हा मेळा प्रत्यक्षात हजारो लहान-मोठ्या, स्थानिक उद्योजकांना, कारागिरांना, कर्मचाऱ्यांना, रोजंदारीवर जगणाऱ्या गरिबांना जगवणारा रोजगार महामेळा आहे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

अनिल फेकरीकर

# बैलांची शक्ती तारक ठरेल!

उदक तारक, उदक मारक। उदक नाना सौख्यदायक। उदकाचा विवेक अलौकिक आहे ॥ असे पाण्याच्या नियोजनाचे महत्त्व दासबोधातून समर्थ रामदास स्वामींनी आपल्याला पटवून दिले. अर्थात पाण्याचा सदुपयोग केल्यास त्यापासून तृष्णातृप्ती, शेतीसाठी सिंचन व्यवस्था आणि जलविद्युत निर्मितीही होऊ शकते. मग अश्वशक्तीच्या धर्तीवर बैलांजवळ असलेल्या शक्तीचा सदुपयोग केल्यास आपण टर्बाईन फिरवून वीज निर्मितीही करू शकतो, असा अभिनव प्रयोग देवलापार गो-विज्ञान अनुसंधान केंद्राचे अध्यक्ष पद्‌मेश गुप्ता आणि डॉ. मनोज तत्त्ववादी यांनी मांडला आहे. खरोखरच हा प्रयोग भविष्यात तारक ठरेल असाच म्हणावा लागेल. आज शेतीत ट्रॅक्टरचा उपयोग वाढल्याने बैल हद्दपार झाले आहेत. परिणामी त्या बैलांना पोसून फायदा काय, असे म्हणत त्यांची रवानगी कत्तलखान्याकडे केली जात आहे. यावर तोडगा म्हणून बैलांच्या शक्तीचा अभिनव उपयोग होऊ शकतो, हे पटवून देण्याची गरज होती. तीच गरज लक्षात घेता गो-विज्ञान अनुसंधान केंद्राने सादर केलेला बैलचलित टर्बाईनद्वारे वीज निर्मितीचा क्रांतिकारी प्रयोग हा ऐतिहासिक आणि चमत्कारिक ठरू शकतो.

प्राचीन काळात माणसाने स्वत:च्या प्रगतीसाठी घोड्यांचा उपयोग सुरू केला होता. त्यातूनच अश्वशक्ती उदयास आली. एका मिनिटात ३३ हजार पाऊंड वजन १ फूट उंच उचलण्यास लागणाऱ्या ताकदीला अश्वशक्ती म्हटले जाते. पाळीव घोड्याचा वापर शेकडो वर्षे शेती, प्रवास, मालवाहतुकीसाठी केला गेला. परिणामी घोडा लोकहिताचा ठरला. आता घोड्यांचा वापर कमी झाला असला तरी त्याला कत्तलखान्यात पाठविले जात नाही. दुर्दैवाने यासंदर्भात बैल हा प्राणी बहुउपयोगी असला तरी तो कमनशिबी ठरला. अचानक आधुनिकता आली अन् ट्रॅक्टर घरोघरी झाल्याने बैलांचे महत्त्व संपले. 'गरज सरो अन् वैद्य मरो' या युक्तीने चालणाऱ्या समाजाने मग बहुउपयोगी आणि पोळ्याला ज्याची मनोभावे पूजा केली जाते त्या बैलांची रवानगी कत्तलखान्याकडे करण्यास प्रारंभ केला. हा बैलांचा होत असलेला प्रवास मनाला प्रचंड वेदना देणारा असल्याने यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न पद्‌मेश गुप्ता यांनी करावा, याबद्दल गोधनावर प्रेम करणाऱ्यांनी त्यांचे अभिनंदनच करायला हवे. आता ही संकल्पना यशस्वी व्हावी म्हणून नागपुरातील रामदेव बाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश पांडे, प्रा. उदय मुजुमदार त्यावर संशोधन करणार आहेत. हे आव्हान फार मोठे असले तरी अशक्य नाही. याकरिता सहजतेने फिरतील असे टर्बाईन संशोधकांना तयार करावे लागतील. जेव्हा टर्बाईन त्या गतीने फिरेल, तेव्हा त्यातून वीज निर्मिती होईल. विशेष म्हणजे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनाही हा प्रयोग आवडल्याने याला नक्कीच राजाश्रय मिळेल यात शंका नाही. हा प्रयोग यशस्वी ठरल्यास बैलांचे महत्त्व वाढेल. परिणामी त्यांचा जीव वाचेल अन् गोहत्याबंदी कायदा खऱ्या अर्थाने यशस्वी होईल. कुठलेही कार्य कायदा बनविल्याने यशस्वी होत नसते. त्यात लोकाश्रयसुद्धा गरजेचा असतो. जेव्हा गोपालकांना बैलांचे महत्त्व पटेल तेव्हाच त्यांची रवानगी कत्तलखान्यातून टर्बाईन फिरविण्याकडे होईल. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' असे सर्वांनाच सांगितले गेले. अगदी असाच प्रयत्न आता बैलांच्या शक्तीचा सदुपयोग करण्यासाठी करावा लागेल. बैलांची शक्ती ही रोज सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीप्रमाणे असल्याची बाब शंभरीसाठी गोधन दलालांच्या हवाली करणाऱ्यांना पटवून द्यावे लागेल. समजा हा प्रयोग यशस्वी ठरल्यास गावागावांत टर्बाईन लागतील आणि ती खेडी वीज निर्मितीत स्वयंपूर्ण होतील. आज अन्न, वस्त्र, निवारा आणि वीज या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. यातील एखादी गरज बैलांच्या शक्तीद्वारे पूर्ण झाली तर औष्णिक विजेसाठी कोळसा जाळण्याचे प्रमाण घटेल. यातूनच प्रदूषण घटेल. शेवटी, भगवान शंकराला प्रसन्न करण्यासाठी देवळात गेलेला भक्त प्रथमत: नंदी बैलास स्पर्श करून आशीर्वाद घेतो. नंतरच त्याला भगवान शिवाची प्राप्ती होती. मग देवळात श्रद्धेपोटी आपण दगडाच्या नंदीसमोर नतमस्तक होतो. तीच श्रद्धा प्रत्यक्षात आणत सजीव नंदीला कत्तलखान्यात न पाठविता त्याचा उपयोग टर्बाईन फिरवून वीज निर्मितीसाठी केला तर नक्कीच आपण खरे पुण्यवान ठरू शकतो, नाही का?

९८८१७१७८५९

## आजचे संघगीत-६४

शनिवार, ६ डिसेंबर २०२५

### देव चरणों में तुम्हारे

हम करें सर्वस्व अर्पण देव चरणों में तुम्हारे।
स्वप्न वह साकार होगा जो बसा नयनों में तुम्हारे ॥धृ.॥

धन्य है हम इस धरा पर दिव्य तेरा अवतरण था
तेरी ज्योति से हटा अज्ञान का जो आवरण था
मंत्र दृष्टा, मार्गदर्शक पूज्य प्रेरक तुम हमारे... ॥१॥

कर्म आहुति दे सुखाया रक्त के प्रत्येक कण को
संगठन कौशल्य तेरा गूंथता प्रत्येक मन को
विविध रूपों में प्रकाशित प्रखर जीवन मूल्य सारे... ॥२॥

सुव्यवस्थित, स्वाभिमानी राष्ट्र तेजस्वी सदा हो
सांस्कृतिक अवधारणा से भेद अवगुण सब विदा हो
देश का उत्कर्ष निश्चित, संघ शक्ति के सहारे... ॥३॥

सृष्टि के कल्याण मंगल से भरी शुभ कल्पना ले
जगत् जननी, जगद्‌गुरु माँ भारती की अर्चना में
भक्ति, श्रद्धा सुमन पथ पर साध्य साधक को निहारे ॥४॥

## प्रासंगिक

कुशल विजयराव सेनाड

# वैदिक 'दण्डकर्म पारायणम्'चे वैज्ञानिक महत्त्व



आजच्या डिजिटल युगात विद्यार्थी लक्ष केंद्रित करणे, स्मरणशक्ती कायम ठेवणे आणि सतत शिकण्याची क्षमता यांसारख्या मूलभूत गोष्टींमध्ये प्रदीर्घ संघर्ष करत आहेत. मोबाईल, सोशल मीडिया, गेमिंग, रील्स संस्कृती यामुळे ''डिजिटल कॉग्निटिव्ह ओव्हरलोड'' निर्माण होत असून विद्यार्थ्यांचे एकाग्रतेचे कालावधी (अटेन्शन स्पॅन) ऐतिहासिकदृष्ट्या किमान पातळीवर पोहोचले आहेत.

अशा काळात १९ वर्षांचे देवव्रत महेश रेखे यांनी शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यंदिन शाखेतील २००० मंत्रांचे ''दण्डकर्म पारायणम्'' ५० दिवस अखंड, शुद्ध उच्चारणासह पूर्ण केले, ही घटना फक्त आध्यात्मिक दृष्टीने नव्हे तर वैज्ञानिक, न्यूरो-कॉग्निटिव आणि मानवी क्षमता-विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे.

या साधनेसंदर्भात काही लोक विचारतात, ''यात टेक्नॉलॉजी काय? विज्ञान कुठे आहे? कोणते मशीन तयार झाले?'' हा लेख त्या प्रश्नांना तथ्यपूर्ण संशोधन, वैज्ञानिक प्रयोग आणि आधुनिक मेंदूविज्ञान यांच्या आधारे उत्तर देतो.

**१. वैदिक मंत्रोच्चार : विज्ञानाच्या भाषेत :** वैदिक मंत्र हे अनुनाद, लय, स्वर, उच्चारातील गणिती अचूकता आणि ध्वनी-भौतिकी (acoustic physics) यांचे परिपूर्ण मिश्रण आहेत. वेगवेगळ्या मंत्रांची फ्रिक्वेन्सी १०० हर्ट्ज ते ८०० हर्ट्जपर्यंत बदलत असते.

**वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले परिणाम :**

१.१ ब्रेनवेव्हमध्ये सकारात्मक बदल

ईईजी अभ्यासांनुसार मंत्रोच्चाराच्या वेळ

$\alpha$ - waves (relaxation) वाढतात

$\theta$ - waves (deep focus) वाढतात

$\gamma$ - waves (high-level cognition) सक्रिय होतात

यामुळे शिकण्याची क्षमता, फोकस, स्मरणशक्ती आणि भावनिक स्थिरता वाढते.

**२. न्यूरोप्लॅस्टिसिटी आणि स्मरणशक्ती वाढ**

वैदिक पारायण हे "repetition-based cognitive training" आहे. यामुळे मेंदूतील hippocampus, prefrontal cortex आणि auditory cortex अधिक सक्षम होतात.

**वैज्ञानिक निष्कर्ष :** दीर्घकाळ मंत्रजप hippocampus चे आकारमान वाढते.

मेंदूची neural connectivity सुधारते.

long-term memory consolidation तीव्र होते.

स्मरणशक्ती अधिक स्थिर व दीर्घकालीन (long-term retention) होते.

**याचे कारण :** १. एकसारख्या ध्वनी-पॅटर्नची पुनरावृत्ती.

२. श्वसन-ध्वनी समन्वय.

३. श्रवण प्रांताचा (auditory cortex) सतत व्यायाम.

४. ध्यान-स्थिती जवळ जाणारी brainwave activity

**३. श्वसन-ध्वनी तंत्र :** Breath–Sound Synchronization

वैदिक मंत्र पठनात प्रत्येक मंत्राचा विशिष्ट उदात्त, अनुदात्त, स्वरित, मात्रा, गण आणि उत्सर्ग असतो. या श्वसन नियंत्रणाचा थेट परिणाम-

- Breath–Sound Synchronization
- हृदयगती स्थिर
- तणाव कमी
- शरीर-मन समन्वय सुधार

हा प्रोसेस आधुनिक biofeedback therapy, pranayama neuroscience आणि breath-based emotional regulation therapy यांच्याशी तंतोतंत जुळतो.

**४. भारतीय वैदिक परंपरा :** माहितीसंरक्षणाचे प्रगत तंत्रज्ञान

यजुर्वेद, ऋग्वेद, सामवेद यांचे जतन हजारो वर्षे ''ओरल-कोडिंग सिस्टिम''मुळे शक्य झाले.

ही प्रणाली म्हणजे आधुनिक भाषेत

error control coding

data redundancy protocol

multi-path verification system

zero-error memory technique

याला पूर्ण जग ''ह्युमन सुपर-मेमरी टेक्नॉलॉजी'' म्हणून पाहते.

देवव्रत यांनी ही क्षमता ५० दिवसांच्या तपश्चर्येत सिद्ध केली.

**५. ५० दिवसांची 'दण्डकर्म पारायण' साधना एक वैज्ञानिक विश्लेषण.**

त्यांनी जे साध्य केले त्यात समाविष्ट आहे :

उच्च स्तराचे sustained concentration

२००० मंत्रांची अक्षरश: स्मरणशक्ती

दीर्घकाळ श्वास-ध्वनी समन्वय

मानसिक व शारीरिक सातत्य

परंपरागत आवाजातील pitch accuracy

early-morning brain optimization

distraction-free cognition

अशा क्षमतांना neuroscience आणि cognitive science मध्ये rare high-performance human state म्हटले जाते.

**६. आजच्या विद्यार्थ्यांसाठी याचा संदर्भ**

आजच्या विद्यार्थ्यांचे लक्ष तुटण्याची गती काही सेकंदांवर आली आहे.

''मॉर्निंग लर्न-इव्हिनिंग फॉरगॉटन'' ही स्थिती सर्वत्र आहे.

याचे कारण

- स्क्रीन ॲडिक्शन
- dopamine overload
- multitasking
- माहितीचा अतिरेक
- कमी झोप
- मेंदूला न दिलेली विश्रांती

देवव्रत यांची साधना विद्यार्थ्यांना सांगते

''स्मरणशक्ती कमी होत नाही- फक्त प्रशिक्षण थांबलं आहे.''

''फोकस हा जन्मजात नसतो - सरावातून निर्माण होतो.''

**त्यांची साधना विद्यार्थ्यांसाठी आदर्श कारणे**

स्मरणशक्ती वाढवण्याची परंपरागत पद्धत

एकाग्रता वाढवण्याची नैसर्गिक पद्धत

मानसिक स्थैर्य वाढवण्याची वैज्ञानिक पद्धत

शिस्त आणि सातत्य विकसित करण्याचा मार्ग

**७. या साधनेतून 'यंत्र' तयार झाले का? नाही. पण 'मानवी क्षमता' तयार झाली.**

काही लोक म्हणतात, ''यातून टेक्नॉलॉजी कुठे बनली? ''

**समजून घ्या**

- मॅराथॉन धावणे - मशीन तयार होत नाही.
- योग - मशीन तयार होत नाही.
- संगीत साधना - मशीन तयार होत नाही.
- मेडिटेशन - मशीन तयार होत नाही.

पण मानवी मेंदू अधिक वेगवान, शांत, संयमी, सक्षम आणि प्रभावी बनतो.

वैदिक पारायण हेही तसंच आहे- a human enhancement technology.

**८. वैदिक पारायणाचे ७ महत्त्वाचे वैज्ञानिक फायदे**

१. फोकस वाढतो.

२. स्ट्रेस कमी होतो.

३. Brainwave optimization.

४. Long-term memory मजबूत होते.

५. Auditory precision वाढते.

६. Emotional stability सुधारते.

७. Cognitive discipline विकसित होते.

९. वैज्ञानिक संशोधनांची यादी (References)

(हे सर्व peer-reviewed व मान्यताप्राप्त संशोधन आहेत)

१. Jeevan K. P., Sandhya P. – Neurophysiological and Cognitive Benefits of Mantra Chanting Practices (२०२५).

२. Tony Bayan & Nabamita Deb – Effect of Mantra Chanting on Power Spectral Density (२०२५).

३. Shreeraksha Sreenivasan – The Impact of Vedic Chanting Intervention on Sustained Attention and Working Memory (२०२४).

४. Swapna Mahanty et al. – EEG Analysis of Maha Mantra: Anxiety & Depression Reduction (२०२४).

५. Maurya P.K., Nidhi – Omkar Meditation in Vedic Texts – A Neuroscience Review (२०२४).

६. International Journal of LTEMAS – Effect of Chanting Mantras and Their Impact on the Human Brain (२०२५).

७. Wisdomlib – Health Impact of Om Chanting: A Scientific Summary (२०२३).

८. Harvard Medical School – Sound-based Neurotherapy & Parasympathetic Activation Studies.

९. AIIMS Delhi – Breath–Sound Synchronization & Vagal Activation Research

**निष्कर्ष :** दण्डकर्म पारायण हे धर्मापुरते मर्यादित नाही. ते मेंदू विज्ञानाशी, मन-शरीर संतुलनाशी, स्मरणशक्ती वाढवण्याच्या पारंपरिक पद्धतीशी, आधुनिक मेडिटेशन न्यूरोसायन्सशी, कॉग्निटिव्ह परफॉरमन्स इनहान्समेंटशी पूर्णपणे जुळते. देवव्रत महेश रेखे यांचे ५० दिवसांचे पारायण हे भारतीय परंपरेतील मानवी क्षमता विकासाचे जिवंत उदाहरण आहे.

(M.Sc.(Microbiology) B.Ed., Ph.D (Research Scholar), Dip. In Genetic Engg., Dip. In Soil and Water Analysis.

८१७७९०३०३०)

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# निलंगा बस आगाराच्या ढिसाळ नियोजनामुळे प्रवाशांना मनस्ताप

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ६ डिसेंबर :** निलंगा बस आगाराच्या बसस्थानकातील बसचे वेळापत्रक कोलमडले आहे. प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे

## बसच्या वेळापत्रकाचा उडाला बोजवारा

प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. निलंगा बस डेपोच्या प्रशासनाविरोधात प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

निलंगा बस डेपोची प्रवासी सेवा अक्षरशः कोलमडली असून वेळापत्रकाचा थोडा नाही तर पूर्ण बोजवारा उडाला आहे. दररोज निर्धारीत वेळेवर बस न सुटणे, काही बस मार्गातच गायब होणे, तर काही बस थेट इतर मार्गावर वळवणे या सर्व प्रकारांनी प्रवाशांचा संयम तुटला आहे.

डेपो व्यवस्थापनाच्या निष्क्रियतेमुळे प्रवासी आज अक्षरशः राम भरोशावर प्रवास करत आहेत. प्रवाशांनुसार, कोणत्या बसला किती वेळ लागणार, ती कोणत्या मार्गावर जाणार, चालक आला का नाही याचा कोणालाच पत्ता नसतो. वाहतूक नियंत्रकांकडून मिळणारे उत्तर एकच बस येईल थांबा. बाहेरच्या आगारातून निलंगा बस स्थानकात येणाऱ्या व जाणाऱ्या बस ची वेळ बसस्थानकातील नियंत्रकांकडून प्रवाशांना व्यवस्थित सांगितले जात नाहीत.




या ढिसाळ कारभाराचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसत आहे. विद्यार्थी गाड्या न मिळाल्यामुळे उशिरा शाळा-कॉलेजात पोहोचत आहेत.महिलांना बस थांब्यावर तासन्तास बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. शेतकरी आणि मजुरांचे काम विस्कळीत झाले आहे. रुग्णांना वेळेत इस्पितळात जाणे कठीण झाले आहे. बस सेवेसारख्या मूलभूत सुविधेत हा गोंधळ सुरू असेल, तर ग्रामीण भागातील जनतेची अडचण किती गंभीर आहे, हे सहज दिसून येते.

निलंगा डेपोतील बस चालक वाहक नियंत्रक वाघावर प्रमुख यात कोणताच ताळमेळ दिसून येत नाही त्यामुळे एकाच वेळेस एकाच मार्गावर जाणाऱ्या चार चार गाड्या फलाटावर लागतात व त्यानंतर तास दोन तास गाड्याच फलाटावर लागत नाहीत अशी स्थिती निलंगा बस स्थानकात दिसून येत आहे.

निलंगा-बसपूर, निलंगा-उमरगा, निलंगा-औराद, निलंगा-लातूर यांसह सर्व मुख्य मार्गांवर बस वेळापत्रकात ताळमेळ राहिलेलेच नाही. निलंगा डेपोमध्ये चालक वाहक संख्या पुरेशी नाही का? चालक-वाहक वेळचे बंधन पाळत नाहीत का? वेळापत्रकाचे नियोजन कोण पाहतो? डेपो प्रशासन नेमके करतं तरी काय? असा प्रश्न प्रवाशांकडून केला जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या गोंधळामुळे प्रवाशांचा राग टोकाला पोहोचला आहे. आता निर्णय घ्या; अन्यथा आम्हीही कठोर पाऊल उचलू,व आंदोलन करण्याचा इशारा प्रवाशांकडून देण्यात आले आहे. बस वेळापत्रक सुरळीत केले नाही, तर प्रवाशांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

प्रवासी सेवा ही राज्य परिवहनची सर्वात मूलभूत जबाबदारी असून निलंगा डेपोच्या अकार्यक्षमतेमुळे प्रवाशांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे.

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी 'प्रेमनाथ'च्या प्रयोगाची निवड



**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ६ डिसेंबर :** येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यात ३५ शाळांनी सहभाग घेतला होता. या प्रदर्शनात माध्यमिक व उच्चमाध्यमिक गटातून तालुक्यातील थेरगाव येथील श्री प्रेमनाथ विद्यालयातील सोनवणे कार्तिक या विद्यार्थ्याने सादर केलेला प्रयोग तालुक्यातून पहिला आला.

या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षक व्ही. एस.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली लाय फाय डेटा ट्रान्स्फर तंत्रज्ञान हा प्रयोग सादर केला. या प्रयोगात कोणत्याही प्रकारचे इंटरनेट न वापरता कोणताही डेटा सहज दुसऱ्याला पाठविता येतो. त्यामुळे सायबर गुन्हे सहज कमी करता येऊ शकतात हा उत्कृष्ट प्रयोग सादर केला. त्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मुख्याध्यापक घटकार होते तर प्रमुख पाहुणे गटशिक्षण अधिकारी अनिल पागे हे होते.

या वेळी केंद्रप्रमुख वाघमारे, बिडवे, सुनील गायकवाड, हस्मी, नाईकवाडी उपस्थित होते. गटशिक्षण अधिकारी अनिल पागे यांच्या हस्ते सोनवणे कार्तिक व विज्ञान शिक्षक व्ही. एस. पवार यांना प्रमाणपत्र व पदक देण्यात आले.

दरवर्षी आपल्या विज्ञान विषयाच्या माध्यमातून शाळेला बक्षीस पात्र ठरवणाऱ्या व्ही.एस.पवार या शिक्षकाचा सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या उत्कृष्ट कामगिरी बद्दल श्री प्रेमनाथ विद्यालयाचे संस्थाअध्यक्ष संजय शिंदे, सचिव बाबुराव पेठे, नारायण पाटील, संचालक शंकर पाटील, मुख्याध्यपक तांदळे यांच्यासह शिक्षक, पालक तसेच सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

# गुरुकृपेनेच आम्हाला सेवेची संधी लाभली : गहिनीनाथ महाराज

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, ६ डिसेंबर :** ज्ञान अभ्यास अधिकार नसतानाही केवळ गुरुपिता ज्ञानेश्वर महाराज यांचा कृपाशीर्वाद मिळाल्यामुळे आम्हाला गुरुपरंपरेची सेवा व शिष्यांचे प्रेम लाभले असून गुरुकृपेनेच आम्हाला सेवेची संधी लाभली असे प्रतिपादन पंढरपुर विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले.



समर्थ सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यस्मरण सोहळ्यात कीर्तनाची सेवा त्यांचे समाधी सन्मुख करताना महाराज बोलत होते. परंपरेतील द्वितीय सत्पुरुष श्री मल्लप्पा महाराज यांचा 'नसता माझा अधिकार बळेच ठेवून या कर' या अभंगावर आपल्या विद्वतप्रचूर रसाळ वाणीतून चिंतन मांडताना आपल्या हातात काही नाही. आहे ते त्या भगवंताचं आणि आपल्या सद्गुरुच आहे. आपण त्यांचे सेवक आहोत. त्यांची अखंड सेवा हेच आपले कर्तव्य व जीवनाचे कर्तव्यता ठरते.

या गुरुपरंपरेची सेवा सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या आज्ञेनुसार व इच्छेनुसार आम्ही आजवर करीत आलो. यात गादीची मर्यादा शिकवण विचार व नित्यनेम यात तसुभर देखील हायगय केली नाही. त्यांच्या कृपेने सेवेचे फळ आज आम्हाला लाभले आणि विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने लाखो वारकऱ्यांच्या सेवेचे भाग्य लाभले सद्गुरु वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थांनच्या गुरुपरंपरेची सेवा करता आली असे मत गुरुवर्य गहिणीनाथ महाराज यांनी व्यक्त केले.

आप्पांना जाऊन पंचवीस वर्षे झाले पण त्यांचा उपदेश शिकवण तत्व याचा क्षणभर देखील मला विसर पडला नाही. ज्ञानेश्वर महाराज हेच आमचे सद्गुरू व आमचे देव मानून आम्ही सेवा करतो असे त्यांनी सांगितले. आप्पांनी गळ्यात घातलेली तुळशीमाळ श्वासापर्यंत नव्हे तर त्यानंतरही निघणार नाही कारण ती गादीच्या निरंतर सेवेच्या व्रताशी बांधील आहे. कृपा कटाक्ष न्याहाळीले आणि आपल्या पदी पैसे दिले. जे आहे ते आप्पांचेच आमचे काही नाही व अधिकार तर मुळीच नाही मीही गादीचा परंपरेचा सेवक या भावनेतून काम करतो असे हभप गहिणीनाथ महाराज यांनी स्पष्ट केले.

# बॅनर फाडाफाडीवरून सोशल मीडियावर एकमेकावर आरोप प्रत्यारोप

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ६ डिसेंबर :** बॅनर फाडाफाडीवरून निलंग्यातील राजकारण तापले असून काँग्रेसचे बॅनर भाजपने फाडल्यायाचा आरोप तर भाजपचे बॅनर काँग्रेसने फाडल्याचा आरोप प्रत्यारोप सोशल मीडियावर करण्यात आले आहे. दोन्ही पक्षाकडून व्हाट्सअप वर बॅनर फाडल्याचे फोटो व्हायरल करण्यात आल्याने निलंग्यात राजकीय ताण तणाव वाढण्याची स्थिती निर्माण झाली आहे.

निवडणुकीला स्थगिती मिळाल्यानंतर पुन्हा २० डिसेंबर रोजी निलंगा नगरपालिकेचे मतदान होणार आहे आणि रंगात आलेल्या प्रचार एक दिवस मतदान प्रक्रियेला असताना निवडणूक आयोगाकडून अचानक स्थगिती दिल्याने नगराध्यक्ष पदासह नगरसेवकांनी केलेल्या प्रचार व मेहनत वाया गेले. त्यामुळे नगर पालिका निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेसाठी अजून पंधरा दिवस अवधी असल्याने शहरात गेल्या काही दिवसापासून विविध पक्षाचे लावण्यात आलेले बॅनर फाडाफाडीवरून राजकारण तापले आहे. काँग्रेसचे बॅनर भाजपने फाडले असा आरोप केला जात आहे तर भाजपानी काँग्रेसचे बॅनर फाडले म्हणून त्यांच्याकडून आरोप केला जात आहे. हे दोन्ही आरोप व बॅनर फाडाफाडी झालेले चित्र सोशल मीडियावर टाकून एकमेकावर आरोप प्रत्यारोप करत आहेत. यामुळे निलंगा शहरातील राजकीय पक्षात वातावरण तापले आहे.

नगरपालिका निवडणूक पुढे ढकलल्याने पुन्हा उमेदवारांना मतदान करून घेण्याच्या प्रक्रियेपर्यंत मतदारापर्यंत जावे लागणार असून बॅनर फाडण्यावरून वाद निर्माण होत आहेत.

काँग्रेसकडून निलंग्यात आतापर्यंत काँग्रेसची भरपूर बॅनर फाडली पण कुठलातरी एक व्हिडिओ टाकून आम्हाला आपली बदनामी करायची नाही अशी पोस्ट सोशल मीडियावर टाकून आरोप केला आहे. तर निलंग्यात भाजपाचा बॅनर बतईने फाडलेशहरांत वातावरण बिघडवण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचा भाजपाकडून आरोप करून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले आहे. भाजप व काँग्रेसकडून बॅनर फाडाफाडीवरून रडीचा डाव सुरू असून दोन्हीकडील कार्यकर्त्याकडून सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

# चाकूर येथे महामानव डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, ६ डिसेंबर :** भारतीय घटनेचे शिल्पकार बोधीसत्व परमपुज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना चाकूर शहरात विविध ठिकाणी अभिवादन करण्यात आले.

महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस बोथी चौक येथे नगराध्यक्ष करीम गुळवे यांनी पूजन करून अभिवादन केले.

यावेळी शहरातील नालंदा नगर,बौद्ध नगर, डॉ.आंबेडकर चौक, सिद्धार्थ नगर, आंबेडकर नगर याठिकाणी सामूहिक वंदना घेवून डॉ. बाबासाहेबांना



अभिवादन करण्यात आले. दरम्यान प्रथम नगराध्यक्ष, नगरसेवक मिलिंद महालिंगे, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे, नगरसेवक नितीन रेड्डी, नगरसेवक भागवत फुले, राम कसबे,नरसिंग गोलावार आदी मान्यवरांनी अभिवादन केले. अभिवादन सभेला विलास महालिंगे, नागसेन महालिंगे, प्रभाकर गायकवाड, संदीप महालिंगे, नितीन डांगे, विष्णू तिकटे, सचिन चाकूरकर, शरद किणीकर, चेतन महालिंगे, विकास पाडमुखे, प्रा.भिमराव साळवे, उमेश कांबळे, प्रा.कांबळे, देवानंद महालिंगे, भीमसेन महालिंगे, शकील गुळवे, बजरंग रेड्डी, छायाताई घोरपडे, शिवकुमार वाघमारे आदिसह समाजबांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

# बीओटी गाळेधारकांना व्याजात १००% सूट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या गाळे व बी ओ टी गाळ्यांचे भाडे मोठ्या प्रमाणात थकीत असून, हि थकबाकी कमी होऊन अधिकाधिक भाडे वसुली व्हावी तसेच थकबाकी असलेल्या गाळेधारकांना भाडे भरण्यास प्रोत्साहित करण्याच्या हेतूने लातूर शहर महानगरपालिका मार्फत दि. ०८.१२.२०२५ ते दि. ३१.१२.२०२५ पर्यंत मनपा मालकीच्या व बी ओ टी तत्वा वरील गाळेधारकांना व्याजामध्ये १००% सुट जाहीर करण्यात आली आहे.



मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या आदेशान्वये व उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या नियोजनात ही व्याजसुट योजना राबविली जाणार असून गाळेधारकांनी व्याजसुटीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने गाळेधारकांना केले आहे.

विविध गाळे धारकांच्या व्याजमाफी संदर्भात मागणीला सकारात्मक प्रतिसाद म्हणून व्याजसुट देण्याचा निर्णय मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी घेतला आहे. तरी या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन ज्या गाळे धारकांकडे थकबाकी आहे अशा गाळेधारकांनी तात्काळ एकरकमी थकबाकीचा भरणा करुन मनपास सहकार्य करावे व होणारी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले आहे.




# सम्राट चंद्रगुप्त मौर्य स्कूलमध्ये डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ६ डिसेंबर :** सम्राट चंद्रगुप्त मौर्य इंटरनॅशनल स्कूल, रुद्धा ता.अहमदपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये अध्यक्ष म्हणूनगणेश शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत असलेल्या सम्राट चंद्रगुप्त मौर्य इंटरनॅशनल स्कूल चे संचालककुलदीप हाके पाटील व संचालिका सौ. शिवालिका कुलदीप हाके पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमामध्ये शाळेचे संचालक कुलदीप हाके पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी मोलाचे विचार मांडले आणि बाबासाहेबांचे विचार विद्यार्थ्यांना आत्मसात करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक हरिदास सर यांनी केले व सूत्रसंचालन कोईलवाड सर यांनी केले तसेच विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी भाषणे सादर केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी यांचे योगदान लाभले.

# डॉ.बाबासाहेबांच्या अस्थींना अभिवादन; पानगावात उसळला भीमसागर

**त.भा. वृत्तसेवा,**

**पानगाव, ६ डिसेंबर :** विश्वरत्न महामानव पं.पु.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी पानगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी अभिवादनाला लाखो आंबेडकर अनुयायांनी मोठी गर्दी केली. जिथे बाबासाहेबांचा अस्थी कलश आहे तो भाग माणसांनी गर्दीनी फुलून गेला होता जणु आपल्या मुक्तीदात्याला नतमस्तक होण्याकरीता लाखोंचा जनसागरच लोटला होता.

६ डिसेंबरच्या पहिल्या मिनिटाला अस्थी स्थळी भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलांच्या वतीने मानवंदना दिली गेली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करून भदंत पय्यानंद थेरो यांनी उपस्थितांना सामूहिक पंचशील त्रिशरण दिले.सकाळी पानगावच्या सरपंच सौ.मीनाताई मोटाडे यांच्या हस्ते डॉ.आंबेडकर चौकातील निळा ध्वज अर्ध्यावर घेत ध्वज अवरोहन करण्यात आले. सकाळी दहा वाजता चैत्य स्मारक स्थळी चंद्रचूड चव्हाण यांच्या हस्ते तर सकाळी १०.४० वाजता डॉ. बाबासाहेब यांच्या अस्थी आणणारे सुर्यभान आचार्य यांच्या हस्ते अस्थी कलशा जवळील निळ्या ध्वजाचे ध्वज-अवरोहन करण्यात आले.







चौका-चौकांत अभिवादनाचे बॅनर,विविध पक्ष संघटनेचे मोफत अन्नदानाचे स्टॉल, आंबेडकरी पुस्तकासह आंबेडकरी साहित्य विक्रीचे शेकडो लागले स्टॉल होते. तसेच विविध स्क्तपेढीचे रक्त संकलन केंद्र, रस्त्याच्या दोन्ही बाजूनी जागो-जागी परिसरातील नामवंत गायकांनी भीम गीतांचे स्टेज उभारून भिमगीतां मधून संदेश देणारे गित गायन सुरू होते. गावाच्या एक किलोमीटर लांब वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था केली होती.

यावेळी अपर जिल्हाअधिकारी श्रीमती शिल्पा करमरकर, पोलीस अधिक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र चौधर, तहसीलदार प्रशांत थोरात यांनी अस्थीला अभिवादन केले. आलेल्या लाखो आंबेडकरी अनुयांयीची कसलीही गैरसोय होणार नाही या करिता, पोलीस प्रशासन, समता सैनिक दल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पानगावचे भदंत पय्यानंद थेरो, नामदेव आचार्य, विश्वनाथ आचार्य, क्षितीज रोडे, सुकेश भंडारे, सुभाष आचार्य, जे. सी. पानगांवकर, विष्णु आचार्य, गोरोबा आचार्य, नागनाथ चव्हाण, किशोर आचार्य, गौतम आचार्य, पंडीत आचार्य, रमेश तिगोटे, सत्यशिला आचार्य, तुकाराम कांबळे, शिवाजी आचार्य, आदींनी परिश्रम घेतले.




# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'कॉक्सिट'मध्ये अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**

**पानगाव, ६ डिसेंबर :** येथील कॉक्सिट महाविद्यालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष डॉ.एम. आर. पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. पाटील यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याला उजाळा दिला. यावेळी प्राचार्य डॉ. विनायक जाधव, उपप्राचार्य डॉ. भोसले, प्रबंधक संतोष कांबळे, अधीक्षक प्रदीप कावळे, डॉ. मासूमदार, प्रा. बी. बी. देवडे, प्रा. धोत्रे, प्रा. वाघमारे, अशोक सवई, डॉ. नीलेश मोरे, प्रा. सुदर्शन शिंदे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जळकोट ग्रामपंचायतीच्या वित्त आयोग निधीमध्ये भ्रष्टाचार

## उपसरपंचाचे उच्चस्तरीय चौकशीसाठी निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ डिसेंबर -**

जळकोट ग्रामपंचायतीच्या वित्त आयोग निधीमधील लाखो रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी उपसरपंच प्रशांत नवगिरे यांनी केली आहे. त्यांनी ही मागणी मुख्यमंत्री, जिल्हा प्रशासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली.

निवेदनानुसार, जळकोट ग्रामपंचायत ही तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत असून, तिला दरवर्षी वित्त आयोगाच्या माध्यमातून ५० ते ७० लाख रुपये विकास कामांसाठी मिळतात. तसेच ग्रामनिधीच्या माध्यमातूनही चांगले उत्पन्न मिळते.

सन २०२४-२५ दरम्यान, ग्राम पंचायतीतून वित्त आयोग निधीमधील विविध कामांची बिलं काढण्यात आली आहेत. मात्र, अनेक बाबींमध्ये शंकास्पद व्यवहार असल्याचे उपसरपंचांनी नमूद केले आहे.

डस्टबिन खरेदी: ८ लाख रुपये साई एन्टरप्रायजेसच्या नावाने बिल काढले. परंतु डस्टबिन अद्याप उपलब्ध नाहीत. फॉगींग मशीन ग्रामपंचायतीकडे यापूर्वी यंत्र नव्हते; तरी २.४५ लाखांचे बिल काढले. महिला प्रशिक्षण: २ लाख रुपये., सिमेंट रस्ते कामे: २५ लाख रुपये., बंदिस्त गटारी: १५ लाख रुपये., शौचालय खरेदी: २ लाख रुपये., पाणीपुरवठा कामे: २६ लाख रुपये असा भ्रष्टाचार झाल्याचे निवेदनात नमूद केले आहे.




उपसरपंच प्रशांत नवगिरे यांनी ही माहिती ग्राम पंचायत अधिकारी आणि त्रयस्त कारभारकांकडे विचारल्यावर उडवाउडवीची उत्तरे मिळाली आणि डस्टबिन खरेदीसाठी धावपळ सुरू असल्याचे सांगितले गेले. निवेदनात म्हटले आहे की, वित्त आयोग आणि ग्रामनिधीचा खर्च करण्यासाठी ग्रामपंचायत बैठकीत चर्चा करून मान्यता घेणे आवश्यक आहे; परंतु याबाबत कोणतीही बैठक न झाल्याचे दिसून येते.

त्यामुळे, प्रत्यक्ष कामे मोजमापानुसार व मापदंडानुसार केली गेली आहेत का, याचीही चौकशी करणे आवश्यक आहे. उपसरपंचांनी आग्रह धरला आहे की, संपूर्ण गैरकारभाराची उच्चस्तरीय तपासणी करून दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत; अन्यथा या विरोधात तिव्र आंदोलन उभारले जाईल. निवेदनाच्या प्रती ग्राम विकास मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव, जिल्हा पोलीस अधिक्षक धाराशिव आणि गटविकास अधिकारी तुळजापुर यांना पाठवण्यात आल्या आहेत.

# उमरगा जि. प. हायस्कूलचा राज्यस्तरीय स्पर्धेत दबदबा



## चार शिक्षकांची विभागीय स्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने यंदा आयोजित करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी स्पर्धा परीक्षेत उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलने चमकदार कामगिरी केली आहे. या शाळेतील तब्बल चार शिक्षकांची विभागीय स्तरावर निवड होऊन शाळेचा दबदबा ठसवण्यात आला आहे.

चांगली पुस्तके आणि गुणवत्ता असलेले शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला दिशा देतात.

याच तत्त्वावर काम करणाऱ्या या शाळेने इन्स्पायर अवॉर्ड, क्रीडा स्पर्धा, सहशालेय उपक्रम, पर्यावरण उपक्रम, गुणवत्ता विकास, पाचवी शिष्यवृत्ती, आठवी एनएमएमएस परीक्षा, तसेच दहावीच्या निकालात सातत्याने उल्लेखनीय यश मिळवले आहे.

या स्पर्धेत मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी शाळेतील विविध क्लबचे सादरीकरण सादर करत तालुका प्रथम क्रमांक पटकावला. गणित शिक्षक बशीर शेख यांनी व्यवसाय मार्गदर्शन या गटात प्रथम क्रमांक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

विद्यानंद सुत्रावे यांनी दहावी बोर्ड परीक्षेच्या कठीण श्रेणीत उत्कृष्ट कामगिरी करून विभागीय स्तरावर तालुक्याचे प्रतिनिधित्व प्राप्त केले. तर गणित विषयातील तंत्रस्नेही शिक्षक नागेश स्वामी यांनी ॲनिमेशन या कठीण स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवून विभाग स्तरावर निवड मिळवली.

या सर्व यशस्वी शिक्षकांचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे, अशोक पतगे, शिक्षणतज्ञ सदानंद शिवदे पाटील, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, केंद्रप्रमुख शीला मदगडे तसेच सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून गौरव केला.

# परंडा उपजिल्हा रुग्णालयात तंबाखू मुक्त कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

उपजिल्हा रुग्णालय परंडा येथे तंबाखू मुक्त कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेचे मार्गदर्शन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी केले.

कार्यशाळेत परंडा तालुक्यातील सर्व खाजगी डॉक्टर, प्राथमिक आरोग्य केंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी, ए.एन.एम., आशा स्वयंसेविका यांचा सहभाग होता. कार्यक्रमात वैद्यकीय अधिक्षक डॉ. अबरार पठाण व समुपदेशक तानाजी गुंजाळ यांनी तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या आजारांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सहभागी आरोग्य कर्मचाऱ्यांना तंबाखूमुळे कर्करोग आणि अन्य गंभीर आरोग्य समस्या होऊ शकतात, तसेच तंबाखूनियंत्रण कायदा २००३ याबाबत माहिती देण्यात आली.

सर्व आरोग्य संस्थांना तंबाखूमुक्त राहण्याचे निर्देश देत कार्यक्रमात डा. कुलकर्णी देवदत्त, डॉ. निलोफर पठाण, अनिल भोसले, चंद्रभान पवार, सहाय्यक अधीक्षक सुधीर मस्के व अमोल शिंदे यांनी कार्यशाळा यशस्वी करण्यास सहकार्य केले.

## जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसविण्याची अंतिम मुदतवाढ...

# मुदत संपल्यानंतर कारवाई होणारी : आरटीओ हर्षल डाके

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या कलम ५० नुसार सर्व वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसविणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १३०२९/१९८५ (एम.सी. मेहता विरुद्ध केंद्र शासन) मधील निर्देशानुसार १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे अनिवार्य करण्यात आले असून, याबाबतचा आढावा रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून घेतला जात आहे.




तसेच रस्ते व महामार्ग मंत्रालयाच्या एचएसआरपी ११६२ (ए) दि. ४ डिसेंबर २०१८ आणि ड.ज. ६०५२ दि. ६ डिसेंबर २०१८ नुसार ६ डिसेंबर २०१८पासून नोंदणी होणाऱ्या सर्व नवीन वाहनांवर एचएसआरपी बसविणे बंधनकारक आहे.

या निर्देशांनुसार धाराशिव जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांना कळविण्यात येते की १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदलेली वाहने एचएसआरपी बसविण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ अशी निश्चित करण्यात आली आहे. वाहनधारकांनी ही मुदत संपण्यापूर्वी स्वतःच्या वाहनांवर एचएसआरपी अनिवार्यपणे बसवून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

मुदत समाप्त झाल्यानंतर एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायदा, १९८८ नुसार कारवाई करण्यात येणार आहे.

मात्र, ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत एचएसआरपी बसविण्यासाठी अपॉइंटमेंट घेतल्यास अशा वाहनांवर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी कळविले आहे.

# उंडेगाव-कडवकर वस्ती रस्ता कामाला सुरुवात

## आ.डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ डिसेंबर -**

आमदार डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्वखर्चातून तालुक्यात रस्त्यांचे काम करण्याचा उपक्रम सुरू असून, युवा सेना तालुकाप्रमुख व परंडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राहुल डोके यांच्या पुढाकारातून उंडेगाव ते कडवकर वस्ती रस्ता दुरुस्ती कामाला सुरुवात करण्यात आली.



अतिवृष्टीमुळे परंडा तालुक्यातील अनेक रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून, खोल खड्ड्यांमुळे नागरिकांना दैनंदिन दळणवळणात गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे.

नागरिकांचा हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी आमदार सावंत यांनी राहुल डोके यांना स्वखर्चातून रस्त्यांची दुरुस्ती करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

या सूचनेनुसार कंडारी, लाखी, राजुरी, आनाळा आदी गावांतील रस्त्यांवरील खड्डे मुरुम टाकून बुजविण्यात आले असून, त्याच धर्तीवर उंडेगाव-कडवकर वस्ती रस्ता कामाचा शुभारंभ झाला.

यावेळी युवा सेना तालुकाप्रमुख राहुल डोके, जिल्हा परिषद माजी सदस्य शिवाजी पवार, रविंद्र शेरे, अशोक कदम, शिवाजी बुरंगे, पंढरीनाथ जेकटे, बाबासाहेब कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, बिभीषण शेरे, अशोक ठवाण, भाऊसाहेब शेरे, नवनाथ झोडगे, संतोष धुमाळ, अमोल जेकटे, कल्याण तागड, भाऊराव टीटवे, सुखदेव गायकवाड, पोपट कडवकर, बिभीषण कडवकर, कल्याण जेकटे, शहाजी शेरे, दत्तात्रय धुमाळ, पांडुरंग गंधे, पांडुरंग शेरे, माजी सरपंच दादासाहेब शेरे, राम दुबळे, भाऊसाहेब गवारे, एकनाथ शेरे, गजेंद्र शेरे आदींची उपस्थिती होती.

# नोटरी करून २२ ट्रॅक्टर व २ जेसीबी घेऊन सुमारे १.२२ कोटींची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

कळंब पोलीस ठाण्यात दोन व्यक्तींविरोधात तब्बल २२ ट्रॅक्टर आणि २ जेसीबी अशा वाहनांची नोटरीच्या माध्यमातून १ कोटी २२ लाख रुपये किमतीच्या फसवणुकीप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.




याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी अजय संतोष चव्हाण (रा. सरताळे, ता. जावळी, जि. सातारा) आणि फीक अब्दुल शेख (रा. दशमेगाव, ता. वाशी, जि. धाराशिव) यांनी २९ जानेवारी २०२५ पासून आजअखेरपर्यंत कळंब न्यायालयासमोर ॲड. चोंदे यांच्या कार्यालयात फिर्यादी व अन्य वाहनमालकांना विश्वासात घेत नोटरी केल्या.

फिर्यादी बालाजी श्रीहरी मोरे (वय ४०, रा. दशमेगाव, ता. वाशी) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी सुरुवातीला डिपॉझिट म्हणून काही रक्कम दिली आणि दरमहा ट्रॅक्टरसाठी ३०,००० रुपये, जेसीबीसाठी १,००,००० रुपये भाडे देण्याचे आश्वासन दिले.

या विश्वासावरून वाहनमालकांनी २२ ट्रॅक्टर व २ जेसीबी त्यांच्याकडे दिले. मात्र आरोपींनी ती वाहने घरून घेऊन जाऊन परत न करता फसवणूक केल्याचे उघड झाले.

फिर्यादी बालाजी मोरे यांनी ४ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३१८(४), २३६, २३७ तसेच महाराष्ट्र फसवणूक प्रकरण (३)(५) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# नळदुर्ग : दक्षिणमुखी हनुमान मंदिरात प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ डिसेंबर -**

नळदुर्ग (आलियाबाद) येथील ऐतिहासिक दक्षिणमुखी हनुमान मंदिरात दि. ५ डिसेंबर रोजी श्री राजगुरू शिवलिंगेश्वर हिरेमठाचे मठाधीपती राजगुरू श्री ष. ब्र. बसवराज शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना आणि कळसारोहण सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने संपन्न झाला.

सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या या प्राचीन हनुमान मंदिराला शेकडो वर्षांचा इतिहास असून, या मंदिराची देखभाल गेल्या अनेक पिढ्यांपासून आलियाबाद येथील पाटील कुटुंबाकडे आहे. कै. बाबुराव भिमराव पाटील यांच्या घराण्याने या परंपरेचे जतन केले असून सध्या महेश कोप्पा पाटील हे पाचव्या पिढीतील प्रमुख म्हणून मंदिराची पूजा-अर्चा आणि व्यवस्थापन पाहतात.

महामार्गालगत असल्यामुळे येथे दररोज मोठ्या संख्येने भक्त दर्शनासाठी येतात.

कालांतराने मंदिराची पडझड झाल्याने जीर्णोद्धाराची गरज निर्माण झाली. यानुसार महेश कोप्पा पाटील यांच्या पुढाकाराने आणि दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने मंदिराचा भव्य आणि आकर्षक जीर्णोद्धार पूर्ण झाला आहे.

दि.४ आणि ५ डिसेंबर रोजी प्राणप्रतिष्ठापना आणि कळसारोहणाचे विविध कार्यक्रम पार पडले.

४ डिसेंबर : नळदुर्ग शहरातून भव्य कळस मिरवणूक काढण्यात आली. ५ डिसेंबर : पहाटे ४ वा. होमहवन विधी झाला. सकाळी ११ वा. महाराजांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण सोहळा पार पडला. त्यानंतर १२.३० वा. महाआरती संपन्न झाली.

या सोहळ्यास भाजप शहराध्यक्ष बसवराज धरणे, सेवानिवृत्त शिक्षक बलभिमराव मुळे, नेताजी महाबोले, माजी नगरसेवक सुधीर हजारे, मल्लिनाथ माळगे, पप्पु पाटील, बंडप्पा कसेकर, रघुनाथ नागणे, जमन ठाकुर, पत्रकार विलास येडगे, उत्तम बनजगोळे, सामाजिक कार्यकर्ते अमर भाळे यांच्यासह शेकडो भाविक उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या संपूर्ण सोहळ्याचे आयोजन यशस्वी करण्यासाठी महेश कोप्पा पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले.

## ३१३ वाहनचालकांकडून २.२४ लाखांचे तडजोड शुल्क वसूल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी ०६ डिसेंबर रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई केली. दिवसभर चाललेल्या मोहीमेत एकूण ३१३ गुन्हे नोंदवून २,२४,००० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

या कारवाईमुळे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांमध्ये धाक बसल्याचे दिसून येत आहे.

# मलकापूर : श्री क्षेत्र दत्त मंदिरात दत्त जयंती महोत्सव भव्य उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.५ डिसेंबर -**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र दत्त मंदिर, मलकापूर येथे दत्त जयंती महोत्सव भव्यतेने साजरा झाला. दत्त जयंती निमित्त दर्शनासाठी राज्यभरातून भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली, ज्यामुळे मंदिर परिसरासह सुभाष महाराज समाधीस्थळ यात्रेच्या स्वरूपात दिसले.



२८ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या अखंड सप्ताहाचा समारोप ह.भ.प. नाना महाराज कदम यांच्या काल्याच्या कीर्तनाने करण्यात आला. कीर्तनानंतर महाआरतीचा सोहळा पार पडला. श्री दत्त जन्मानिमित्त पाळणा गायनसाठी अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला, आणि कार्यक्रमानंतर भाविकांनी मूर्तीवर फुलांचा वर्षाव करत दर्शनाचा लाभ घेतला.

दुपारी बारावाजता सुरू झालेल्या महाप्रसाद अन्नछत्राला भाविकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला; अंदाजे दहा ते पंधरा हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. दिवसभर मंदिर परिसरात सतत भाविकांची रांग लागलेली दिसत होती.

सात दिवस चाललेला सप्ताह, सिद्ध सुभाष बप्पा ग्रंथ पारायण सोहळा आणि दत्तजयंती महोत्सव ह.भ.प. एकनाथ महाराज लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त तुळजाई प्रतिष्ठान बालगृहात प्रेरणादायी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद धाराशिव आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त तुळजाई प्रतिष्ठान संचलित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह, विमानतळ रोड आळणी येथे ३ डिसेंबर रोजी प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न झाला.



कार्यक्रमाचे उद्घाटन भाग्यश्री पाटील (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर) यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थान देवदत्त गिरी (जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी) यांनी भूषविले. यावेळी सचिदानंद बांगर, ॲड. गुंड, ॲड. गाडे, शकील शेख यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. बालगृहातील सर्व मुली, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमात सहभागी झाले.

याप्रसंगी विशेष सत्कारमूर्ती म्हणून डॉ. निखिल नवले (न्यूरोलॉजिस्ट) यांचा गौरव करण्यात आला. गेली सहा ते सात वर्ष बालगृहातील मुलींना विनामूल्य आरोग्य तपासणी व उपचार देत असल्याबद्दल त्यांच्या सततच्या सेवेमुळे मुलींमध्ये झालेल्या सकारात्मक बदलाचा उल्लेख करत त्यांचा सत्कार भावपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहाजी चव्हाण (सचिव तुळजाई प्रतिष्ठान) यांनी सादर केले. दिव्यांग मुलींना योग्य हक्क, संधी आणि सुरक्षित वातावरण देण्याचे महत्त्व भाग्यश्री पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत स्पष्ट केले.

कार्यक्रमात मुलींनी बहारदार गाण्यावर सामूहिक नृत्य सादर करून वातावरण भारावून टाकले. मान्यवरांच्या हस्ते फळवाटप आणि जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये विजेत्या मुलींना पारितोषिक वितरण करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात गिरी यांनी सांगितले की, जागतिक दिव्यांग दिन हा फक्त दिव्यांग दिन म्हणून नाही, तर बालमहोत्सवासारखा आनंदाने साजरा व्हावा.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली कांबळे (मानसोपचार तज्ज्ञ) यांनी केले, तर आभार प्रदर्शन पाटील यांनी मानले.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## जिल्हाधिकाऱ्यांसह बौध्द महासभा, उपासक, उपासिकांची उपस्थिती





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**
शहरातील डॉ आंबेडकर चौकातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पूतळ्याला महापरिनिर्वाण दिनानिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पूतळा समितीचे अध्यक्ष मधुकर मांजरमकर यांची प्रमुख उपस्थिती होती.
येथील महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पूतळ्याजवळ सकाळपासूनच बौध्द अनुयायी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी गर्दी केली होती.
महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ बाबासाहेब यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. यावेळी पूतळा समितीचे अध्यक्ष मधुकर मांजरमकर, डॉ दिपक मोरे, शांताबाई मोरे, भारतीय बौध्द महासभेचे अध्यक्ष सुभाष भिसे, ॲड दिपक मांजरमकर यांच्यासह बौध्द उपासक, उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.
शहरातील सिद्धार्थ (मिलिंद )कॉलनी भागातील तक्षशिला बुद्ध विहारात महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले, यावेळी पत्रकार प्रकाश इंगोले, भाऊराव पंडित, संगीता मुळे अदिनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमास गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षा लक्ष्मीबाई इंगोले, सचिव पर्यागबाई हनवते, रुखमीनीबाई पुंडगे, अनुप हनवते, शिवाजी दिपके, प्रभाकर इंगोले, सदानंद सरकटे, माधव जाधव यांच्यासह आशाबाई खिल्लारे, कविता मोरे, चंद्रकलाबाई जाधव, शालीनी जाधव, गिताबाई दिपके, संगीता सरकटे, उषा इंगोले, सुष्मा हनवते, अल्का कांबळे, ज्योती इंगोले, अनिता इंगोले, अरुणाबाई बलखंडे, दैवशाला साबळे, लता करंडकर, लताबाई भालेराव, मालती कनकुटे, कल्पना लाटे, सरकटे ताई, वाकळे ताई अदिची उपस्थिती होती.

# संविधान अमृत महोत्सवानिमित्त वर्षभर कार्यक्रम राबवा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**
भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होण्याच्या निमित्ताने २६ नोव्हेंबर २०२५ पासून पुढील प्रत्येक वर्षी संविधान अमृत महोत्सव– घर घर संविधान अभियानाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे वार्षिक वेळापत्रक तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व विभागांना दिले आहेत.
जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका, ग्रामपंचायती, सर्व प्रकारच्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, वसतिगृहे व वाचनालयांमध्ये २६ नोव्हेंबरपासून संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात येणार असून 'आपले संविधान – आपला आत्मसन्मान' या उपक्रमांतर्गत संविधान सेल्फी स्टँड उभारले जातील. कर्मचारी व विद्यार्थी यांनी या स्टँडसमोर सेल्फी घेऊन अपलोड करणे बंधनकारक राहील. सर्व कार्यक्रमांची सुरुवात संविधान प्रास्ताविकेच्या वाचनानेच केली जाईल.
शाळा, महाविद्यालये व वसतिगृहात दररोज प्रार्थनेत संविधान प्रास्ताविका वाचन, विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत हक्क, कर्तव्ये व मूल्यांची ओळख करून देण्यासाठी शिक्षक व अधीक्षकांचे मार्गदर्शन, संविधानातील महत्वाच्या कलमांची माहिती सोप्या भाषेत देणे.
हिंगोली जिल्ह्यात संविधान दिनानिमित्त संविधान यात्रा व प्रभात फेरी, पोलीस, स्काऊट-गाईड, होमगार्ड संचलन, संविधान पथनाट्य, चित्रप्रदर्शन, पोस्टर प्रदर्शन, संविधानावर आधारित प्रश्नमंजूषा, निबंध, भाषण, वेशभूषा, काव्यवाचन, चित्रकला इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल.
तसेच वॉक फॉर संविधान, संविधान तज्ज्ञांची व्याख्याने आणि दोन दिवसीय संविधान सन्मान क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहेत.
विशेष दिनानिमित्त वर्षभर संविधान मूल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन (६ डिसेंबर)पासून ते संविधान दिन (२६ नोव्हेंबर) आदी वर्षभरात येणाऱ्या सर्व दिनविशेषांवर संविधान प्रसारासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन व सादरीकरण होणार आहे. यामध्ये संविधानावर आधारित गाणी, देशभक्तीपर गाणी, संविधान प्रसार नाटक, नृत्य इत्यादी उपक्रम राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. हिंगोली जिल्ह्यातील सर्व कार्यालयांनी आपल्या कार्यक्रमांची माहिती व कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा तसेच अधिकृत जिल्हा संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक राहील, अशी माहिती समाज कल्याणच्या सहायक आयुक्त गिता गुठ्ठे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# पैशांच्या व्यवहारातूनच पंजाब मोरे यांचा निर्घृण खून केल्याचे उघड, स्थागुशाकडून दोन आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**
कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत कोपरवाडी शिवारातील पंजाब मोरे खून प्रकरणाला अखेर चार दिवसांनी वाचा फुटली असून या प्रकरणात दोन जणांना आखाडा बाळापूर पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. पैशांच्या व्यवहारातूनच पंजाब मोरे यांचा खून झाल्याचे स्पष्ट झाले आहे.
आखाडा बाळापूर पोलिस ठाणे हद्दीत कोपरवाडी परिसरातील जंगलातून जाणाऱ्या रोडलगत असलेल्या नाल्यामध्ये एक अनोळखी मृतदेह हात बांधलेल्या अवस्थेत दि १ डिसेंबर रोजी सापडला होता. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे यांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली होती. सदरचा प्रकार खून सदृश वाटत असल्याने अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून गुन्हा उघड करण्यासंदर्भाने गुन्हे शाखेला सूचना दिल्या होत्या.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे सपोनि विष्णुकांत गुठ्ठे यांच्या पथकाने अधिक माहीती घेतली असता सदर मृतदेह आखाडा बाळापूर येथील पंजाब मोरे यांचा असल्याचे स्पष्ट झाले. घटनास्थळावर कुठलाही पुरावा नसल्याने खूनाचे गुढ उकलण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे होते. गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, पोउपनि गणेश गोटके, पोलिस अंमलदार भुजंग कोकरे, गजानन पोकळे, साईनाथ कंटे, नरेंद्र साळवे, आकाश टापरे, शिवाजी जालमिरे, हरिभाऊ गुंजकर, ज्ञानेश्वर गोरे, शिवाजी पवार, दत्ता नागरे, प्रदीप झुंगरे, मारोती काकडे यांच्या पथकाने अधिक माहीती घेण्यास सुरूवात केली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज व इतर बाबींची तपासणी केली. त्यानंतर या प्रकरणात सुदर्शन श्रीहरी फड रा शिक्षक कॉलनी आखाडा बाळापूर व त्याचा साथीदार जियाउल्लाखान खाजाखान रा आखाडा बाळापूर यांची चौकशी सुरू केली. मयत पंजाब मोरे यांचय सोबत असलेल्या आर्थिक देवाणघेवाणीच्या व्यवहारातून नियोजनबध्दपणे आणि शांत डोक्याने खून केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे. त्यावरून दोघांनाही अटक करण्यात आली. आखाडा बाळापूर पोलिस व गुन्हे शाखेच्या पथकाकडून अधिक चौकशी केली जात आहे.

## संक्षिप्त वृत्त

### बाळासाहेब आनेवार यांचे निधन



हिंगोली– शहरातील सरस्वती नगरातील माजी नगरसेवक तथा नागनाथ अर्बन को-आप- बँकेचे संचालक बाळासाहेब आन्नेवार अण्णा यांचे ६ डिसेंबर रोजी सकाळी १० च्या सुमारास राहत्या घरी निधन झाले. आदर्श महाविद्यालय परिसरातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. राजकीय, सामाजिक तसेच सहकार क्षेत्रामध्ये त्यांनी कार्य केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, दोन मुली, जावई नातवंड असा परिवार आहे.

### आजपासून बळसोंड येथे अखंड हरिनाम सप्ताह

हिंगोली– ह भ प आत्माराम महाराज पटवे यांच्या आशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह संगीत भागवत ज्ञानयज्ञ सोहळा विघ्नहर्ता गणपती मंदिर संत नामदेव नगर बळसोंड हिंगोली या ठिकाणी आयोजित करण्यात आला असून दिनांक ७ ते दिनांक १४ डिसेंबर पर्यंत हा भागवत सप्ताह आयोजन करण्यात आले आहे या भागवत सप्ताहामध्ये सकाळी पाच ते सहा काकडा भजन,आठ ते साडेआठ यजमानाचे हस्ते श्री ची पूजा, दहा ते बारा सामुदायिक नामजप पुरुष व महिला, दुपारी एक ते पाच भागवत कथा, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, रात्री आठ ते दहा हरिकीर्तन व नंतर गुणीजनांचा हरीजागर होणार आहे. यानिमित्त दररोज किर्तन, भजन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### रेणापूर येथे भव्य कुस्त्यांची दंगल



हिंगोली– दत्त जयंती निमित्त दत्त संस्थान रेनापुर मौजे रेनापुर कळमनुरी येथे यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील कुस्त्यांच्या स्पर्धा विशेष गाजल्या. कुस्तीचे प्रथम बक्षीस काचआंबा येथील महेश उगले यांना सात हजार रुपये रोख देऊन गौरव करण्यात आला. द्वितीय बक्षीस गोपाल गोडघसे राहणार कनेरगाव नाका यांना रोख तीन हजार पाचशे रुपये देऊन सन्मानित करण्यात आले. बक्षीस वितरण दत्त मंदिर संस्थान रेनापुरचे सचिव अश्विन बळीराम पतंगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रेनापुर येथील पोलीस पाटील माधवराव पतंगे, तंटामुक्ती अध्यक्ष सुभाषराव शृंगारे, हनुमान पतंगे, सचिन पतंगे, फुलाजी पतंगे, देविदास शृंगारे गजानन पतंगेआदी मान्यवरांची उपस्थिती होती. कुस्ती स्पर्धेकरिता पंच म्हणून शिवाजी मस्के यांनी उत्कृष्टरित्या काम केले.

# वसमत तालुक्यातील दाभडी येथे कुणबी नोंद सापडली



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ६ डिसेंबर**
तालुक्यातील मौजे दाभडी येथील मराठा कुटुंबातील आत्माराम बाभनाजी दळवी आणि त्यांची मुलगी कु.शिवानी आत्माराम दळवी यांची हैदराबाद गॅझेटिअरनुसार मराठा कुणबी नोंद असल्याची जुन्या कागदपत्रावून पडताळणी करण्यात आली. त्यात त्यांची मूळ नोंद कुणबी असल्याचे सिद्ध झाले आहे.
नुकतेच त्यांना वसमत येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय यांनी त्या नोंदणीची दखल घेत त्यांना मराठा कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले. या मूळ नोंदणी शोधण्यासाठी मराठा कुणबी नोंद समितीने मोलाचे सहकार्य केले आहे.मराठा आरक्षणासाठी ज्यांनी प्रसंगी आपल्या प्राणाची आहुती द्यायला मागेपुढे पहिले नाही, प्रचंड संघर्ष केला आणि आता मराठा समाजाचा शेकडो नोंदी सापडायला सुरुवात झाली आहे. याचे सर्व श्रेय संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना दिले जात आहे. यावेळी वसमत तालुक्यातील सकल मराठा समाजाचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनोज जरांगे पाटील यांच्या प्रयत्नांना आज यश आले असून माझ्या गावातील शेकडो तरुणांना शिक्षण आणि नोकरीमध्ये या कुणबी प्रमाणपत्राची खूप मोठी मदत होईल, अशी अपेक्षा शिवाणी दळवी यांनी व्यक्त केली आहे.

# उमेदच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत घेण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**
शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागांतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन उमेद अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना शासनाच्या समकक्ष पदाचा दर्जा देऊन कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्यात यावे या मागणीचे निवेदन संघटनेच्यावतीने शिवसेना आ. संतोष बांगर यांना देण्यात आले. येत्या हिवाळी अधिवेशनात उमेदच्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवाज उठवावा अशी मागणीही संघटनेच्यावतीने करण्यात आली.
येथील जिल्हा परिषदेअंतर्गत उमेदच्या कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांनी आ. संतोष बांगर यांना विविध प्रलंबीत मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी आ. बांगर यांनी निश्चितपणे हिवाळी अधिवेशनात उमेदच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांबाबत आवाज उठवणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी मोठ्या संख्येने उमेद संघटनेचे पदाधिकारी व कर्मचारी, महिला कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून प्रेरणा घ्यावी– एन. टी. सोळंके



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**
महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले. दिवसांतून १८ तास ते अभ्यास करीत असत. शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मोलाचा मंत्र डॉ आंबेडकरांनी दिला. त्यांचे विचार आज विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचे विचार प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मसात करावेत असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षक एन टी सोळंके यांनी व्यक्त केले.
येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात दि ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे तर प्रमुख वक्ते म्हणून एन टी सोळंके, ए एस गिराम यांची उपस्थिती होती. यावेळी उपमुख्याध्यापक डी पी डोईफोडे, पर्यवेक्षक बी बी शिंदे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. सुरूवातीला मान्यवरांच्याहस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.
यावेळी बोलतांना सोळंके म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लहानपणापासून शिक्षण घेत असतांना अनेक अडचणींना तोंड दिले परंतु त्यांनी त्यांचे शिक्षण चालूच ठेवले. त्यांच्या आई वडिलांनी त्यांना शिक्षणासाठी प्रेरणा दिली. वाचनाची आवड असल्यामुळे रामायण, महाभारत, गौतमबुध्दांचे चरित्र यांचा त्यांनी अभ्यास केला. उच्च शिक्षण प्राप्त केले. डॉ आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व सांगतांना शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे, ज्याने प्राशन केले तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे सांगितले. याचा अर्थ अन्याय सहन करायचा नाही, अन्यायाविरोधात लढायचे.
यावेळी ए एस गिराम यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला राज्य घटना दिली. घटनेचे शिल्पकार म्हणून आज त्यांना आपण संबोधतो. भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. यावेळी विद्यार्थ्यांनीही डॉ आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर भाषणे केली.

# राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनच्या खेळाडूची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**
येथील कै. ॲड. ग्यानबाराव सेवाभावी संस्थेच्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन शाळेच्या विद्यार्थी स्वरूप कल्याणकर याची जिल्हा क्रिडा संकुल छत्रपती संभाजीनगर येथे २० नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या विभागीय बॅडमिंटन स्पर्धेत राज्यस्तरीय निवड झाली आहे या निवडीबद्दल विद्यालयाचे अध्यक्ष व सचिव पंडित शिरसाट सर तसेच इतर पदाधिकारी व सदस्य एस. आर. मेटकर इ. सर्वांनी खेळाडू आणि क्रिडा शिक्षक यांचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी संस्थासचिव पंडीत शिरसाट सर यांच्या वाढदिवस असल्याने सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी यांच्याकडून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



नांदेड- भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना असंख्य अनुयायांनी अभिवादन केले.

# अर्धापूर पोलीसांची अवैध रेती वाहतुकीवर कारवाई ; एक कोटीचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ६ डिसेंबर**

अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करत अर्धापूर पोलिसांनी एक कोटी एक लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हि कारवाई दि.५ डिसेंबर रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास करण्यात आली.

अर्धापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम हे त्यांच्या पथकासोबत गस्त घालत असताना रेतीची अवैध वाहतूक होत असल्याची त्यांना माहिती मिळाली. या माहितीवरुन त्यांनी पिंपळगाव पाटीजवळील विश्वप्रयाग हॉटेलच्या पाठीमागे जावून



त्याठिकाणी असलेल्या रेतीने भरलेल्या हायवा क्र.एमएच-२६-सीएच-१६२९, एमएच-२६-सीएच-२८७७, एमएच-२१-बीएच-२६३५ व टिप्पर क्र.एमएच-४८-जे-०८८५ हि चार वाहने ताब्यात घेतली. याठिकाणी असलेल्या लोकांच्या गर्दीचा फायदा घेत वाहनाचे चालक पळून जाण्यात यशस्वी झाले. या कारवाईत अर्धापूर पोलिसांनी तीन हायवा, एक टिप्पर व रेती असा एकूण १ कोटी १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक चित्तरंजन ढेमकेवाड हे करीत आहेत. हि कारवाई पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम, सहायक पोलीस निरीक्षक चित्तरंजन ढेमकेवाड, पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर सूर्यवंशी, पोहेकॉ. भिमराव राठोड, विजय कदम यांच्या पथकाने केली.

## एचडीएफसी बँक किनवट शाखेच्या वतीने रक्तदान शिबिर

**किनवट**-सामाजिक बांधिलकीची जाण ठेवत एचडीएफसी बँक, किनवट शाखेच्या वतीने परिवर्तन उपक्रमांतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन (दि.०५) रोजी करण्यात आले. या शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण २४ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतावादी कार्याला सहकार्य केले. या शिबिरात रक्त संकलनाची



जबाबदारी कलावती स्वयंसेवक रक्त संकलन बँक, आदिलाबाद यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे उद्घाटन नामांकित उद्योजक गौरव नेम्मानिवार व गंगासिंग बस्सी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, एका थेंबातून अनेकांचे जीव वाचू शकतात, असे सांगत नागरिकांना अशा उपक्रमात अधिकाधिक सहभागी होण्याचे आवाहन केले. एचडीएफसी बँकेच्या देशव्यापी संकल्पनेनुसार कोणालातरी वाचवण्याची भावना या अभियानांतर्गत हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या भावनेने प्रेरित होत अनेकांनी प्रथमच रक्तदान करून सामाजिक कार्यात हातभार लावला. शिबिरात बँकेचे अधिकारी, कर्मचारी, ग्राहक तसेच शहरातील नागरिकांनी उल्लेखनीय सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बँकेचे अधिकारी नारायण जोशी, गोविंद बडे यांच्यासह सर्व सहकारी कर्मचारी व अधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिरातील शिस्तबद्ध व्यवस्थापन, रक्तदात्यांची नोंदणी, आरोग्य तपासणी, तसेच अन्य सर्व सोयींची उत्तम आखणी करण्यात आली. हा उपक्रम केवळ एक सामाजिक घटना नसून, समाजासाठी प्रेरणादायी पाऊल ठरला आहे. एचडीएफसी बँक किनवट शाखेने समाजातील जबाबदारी जपून मानवी मूल्यांना अधोरेखित करणारा हा प्रशंसनीय उपक्रम राबविल्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक व्यक्त केले जात आहे.

## महापरिनिर्वाण दिनी नरसी येथे महारक्तदान शिबिर

**नायगाव** -भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नरसी येथे भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. फुले, शाहू,आंबेडकर क्रांती मंचाचे संस्थापक अध्यक्ष चिटमोगरा येथील सामाजिक



कार्यकर्ते भास्कर भेदेकर यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन झाले. नरसी तील मुख्य चौकात आयोजित या शिबिरासाठी नंदीग्राम ब्लड बँक, नांदेड यांच्या पथकाने सहकार्य केले. डॉ. आदिती मूंडे, राम महाजन, शिवम जबडे, आदित्य तोंडे तसेच पथकातील इतर सदस्यांनी शिबिर सुरळीतपणे पार पडण्यासाठी मोलाची सेवा बजावली. याप्रसंगी रामतीर्थ चे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी नरवाडे, नरसी बिटचे जमादार चंद्रमुणी सोनकांबळे, प्रसिद्ध उद्योगपती राजेंद्र भगवानराव भिलवंडे, पोलीस कॉन्स्टेबल संजय शिंदे, तसेच विविध राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. एकूण ४० ते ८० रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत मानव सेवेचा मोलाचा संदेश दिला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी फुले शाहू आंबेडकर क्रांती मंचाचे कार्यकर्ते नागसेन जिगळेकर, सुनिल कांबळे, गौस भाई शेख, किशोर वाघमारे, सुर्यकांत भेदे, किरण इंगळे, संदीप सोनकांबळे, इंद्रजित डूमने, निळकंठ तरटे, राहुल गायकवाड, किरण डूमने आदींनी अथक परिश्रम घेतले. संस्थापक अध्यक्ष भास्कर भेदेकर यांच्या पुढाकारातून गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक जाणीवेचे असंख्य उपक्रम राबविले जात आहेत. रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनामुळे नरसी परिसरात भेदेकर यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## हदगाव तालुक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**हदगाव**-विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तालुक्यात बौद्ध अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक संस्था तसेच शासकीय कार्यालयात तालुक्यात ठिकठिकाणी अभिवादन करण्यात आले.



समाज सुधारक, अर्थतज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री भीमराव आंबेडकर यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतला होता. हा दिवस भारतात महापरिनिर्वाण दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथील संविधान प्रतिमेस विविध राजकीय व सामाजिक पुढाऱ्यांनी अभिवादनासाठी एकच गर्दी केली होती तसेच शहरातील पंचशील शाळेचे संस्थेचे सचिव सुनील सोनुले यांनी अभिवादन केले तर शहरातील शासकीय व बौद्ध विहारात अभिवादनासाठी अनुयायांनी गर्दी केली होती. हदगाव शहरातील तामसा रोड वर स्थित असलेले श्री साईबाबा निवासी दिव्यांग विद्यालय या ठिकाणी सुद्धा अभिवादनासाठी एक छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळेस प्रा. राजेश राऊत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर मोलाचे मार्गदर्शन उपस्थितांना केले. यावेळेस शाळेचे मुख्याध्यापक एस. बी. पाळेकर, मोरे, ठाकरे, डी.एम. डाके, बी. एस. वाघमारे, आर. एम. वट्टमवार, एस. आर. तावडे, जी. डी. धडेवार, भूषण नरवाडे, सिद्धार्थ वनंजय, टी.व्ही. मुधोळ, वाघमारे मॅडम, घाटे मॅडम, राठोड सर, रामलू सर, चंद्रकांत गुंडेवाड, येरेवाड मॅडम, गोवंदे मॅडम यांच्यासह पत्रकार बांधव व इतर मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सिडकोत ठिकठिकाणी अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ६ डिसेंबर-**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सिडकोतील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक वसरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सिडकोसह सिडकोतील विविध बुद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्रिशरण पंचशील ग्रहण करून अभिवादन करण्यात आले. तर सायंकाळी ५ वाजता माता रमाई बुद्ध विहार शाहूनगर यांच्या वतीने पणती ज्योत रॅली काढण्यात आली.



सिडको येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सकाळी १० वाजता घटनेचे शिल्पकार महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून त्रिशरण पंचशील ग्रहण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी समाज बांधवासह राजकीय, सामाजिक कार्यकर्ते विलास गजभारे, राजू लांडगे, प्रदीप हानवते, डि.के. कांबळे, एकनाथ वाघमारे, डॉ. भास्कर औराळकर, मनोहर कोकरे, चंपतराव कांबळे पांडुरंग वाडे, सूर्यकांत सोनसळे, लक्ष्मण कोलते, सुनील वडगावकर, अनिल मोरे, बालाजी गायकवाड, आकाश सोनकांबळे, भगवान वाडे, उषा मोरे, सीमा कुलदीपके, माया वाडे, मस्के बाई, गौतम सोनसाळे, हर्षवर्धन झडते, सिलवान लांडगे, प्रकाश सरपाते, एकनाथ वाघमारे, रामराव सरपाते, बबन गायकवाड, हौसाजी वाघमारे, राहुल जोंधळे, यांची उपस्थिती होती. तर यावेळी लातूर फाटा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक वसरणी यांच्या वतीने या चौकात पहिलाच अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. या ठिकाणी ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार ओमकार चिंचोलकर यांच्या हस्ते सकाळी ११:३० वाजता पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर पूज्य भानते पायाबोधी महाथेरो यांनी आपल्या भिक्षु संघाच्या उपस्थितीत उपस्थित बौद्ध उपासक - उपासिका यांना धम्मदेशना दिली यावेळी वसरणी येथील मोतीराम गजभारे, देवानंद सरोदे, संयजित वसरणीकर, वामन कंधारे, गौतम गजभारे, रामजी भिसे ,रघुनाथ कांबळे, भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका सुजाता आढाव, सुवास खराणे, प्रसेंजित वाघमारे, निखिल देशमुख, शामराव कांबळे यांची उपस्थिती होती. तर रमामाता बुद्ध विहार शाहूनगर यांच्या वतीने सायंकाळी ठीक ५ वाजता पणती ज्योत रॅली सिडकोच्या मुख्य रस्त्याने काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विसर्जित करण्यात आली. तसेच सिडको येतील जेत्वन बुद्ध विहार, पंचशील बुद्ध विहार, नागलोक बुद्ध विहार, नंदिग्राम बुद्ध विहार, नालंदा बुद्ध विहार, त्रिशरण बुद्ध विहार, प्रबुद्ध बुद्ध विहार, दीक्षा बुद्ध विहार, चंद्रमुनी बुद्ध विहार, माता रमाई बुद्ध विहार, त्रिरत्न बुद्ध विहार, श्रावस्ती बुद्ध विहार, विश्वशांती बुद्ध विहार, कुशीनारा बुद्ध विहार, सम्राट बुद्ध विहार, सुभेदार रामजी आंबेडकर बुद्ध विहार इत्यादी बुद्ध विहारात समाज बांधवांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

# नायगाव जमीन गैरव्यवहार प्रकरण तापले

## महसूल मंत्री बावनकुळेंकडे थेट तक्रार; भूमाफियाअधिकाऱ्यांची संगनमताने कोट्यवधींची लूट?

**गोविंद नरसीकर**
**नरसी, दि. ६ डिसेंबर-**

नायगाव येथील गट क्र. ४१८ आणि सर्वे नं. १२८ सी या विवादित जमिनीवरील कथित बेनामी विक्री, बनावट नोंदी आणि महसूल यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांची संशयास्पद भूमिका या प्रकरणाने आता मंत्रालयापर्यंत धडक दिली आहे. दशकानुदशके सुरू असलेल्या या मालमत्ता व्यवहारांमधील अनियमितता उघडकीस आणत भिमशक्ती सामाजिक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रघुनाथ सोनकांबळे यांनी महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्याकडे सविस्तर तक्रार सादर केली आहे.



**अकृषीक असतानाही 'कृषिक' दाखवण्याचा चमत्कार?**

सोनकांबळे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, संबंधित जमीन १९६७ पासून स्पष्टपणे नॉन-ॲग्रीकल्चरल (छ) असूनही, १९६८ ते २०२१ या कालावधीत महसूल नोंदींमध्ये ती कृषिक दाखवण्यात आल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.गहू, सोयाबीन, हळद अशी पिके दाखवून पाणी उपलब्धतेबाबतही खोटे प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**तहसील कार्यालयभूमाफियाराजकीय मिलीभगत?**

थोड्या काळासाठी जबाबदारी सांभाळणाऱ्या नायब तहसीलदारासह काही तलाठी, मंडळ अधिकारी, तसेच राजकीय मंडळी आणि स्थानिक भूखंड माफिया यांच्या संगनमताने दुबार अकृषिक प्रमाणपत्रे काढून संशयास्पद विक्री करण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनात आहे.या संगनमतातून कोट्यवधींचा व्यवहार रचल्याची माहितीही तक्रारीत नमूद केली आहे.

**जमिनीवर सरकारी सोसायटीची गोदामे तरीही पुनश्च 'अकृषिक'!**

या जमिनीवर पूर्वी नांदेड जिल्हा कृषी औद्योगिक सरकारी सोसायटीने गोदामे उभारली होती. तरी नंतर हीच जमीन पुन्हा 'अकृषिक' करून अगदी कवडीमोल किंमतीत विक्रीस काढल्याचा आरोप करण्यात आला आहे.४ सप्टेंबर २०२४ रोजी देण्यात आलेले नव्याने जारी केलेले अकृषिक प्रमाणपत्रदेखील संशयास्पद असल्याचा उल्लेख निवेदनात आहे.

**महामार्गालगत प्रीमियम लोकेशन; आता उभा राहिला मॉल**

नंदेडनायगावहैदराबादमहामार्गालगत असलेल्या या जमिनीचे महत्त्व प्रचंड. आज त्या ठिकाणी उभा राहिलेला शॉपिंग शटर मॉल, वाढलेले जमीनदर आणि संशयास्पद लिलाव प्रक्रियाया सर्वांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**कोट्यवधींची संपत्ती मोजक्या जणांना अल्पदरात?**

यातून शासनाला मोठ्या महसुलापासून वंचित ठेवण्यात आल्याचा ठपका सोनकांबळे यांनी ठेवला आहे.

**उच्चस्तरीय चौकशीची मागणी; आंदोलनाची चेतावणी**

संपूर्ण प्रकरणाची सखोल, निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकारी, राजकीय व्यक्ती आणि भूमाफियांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सोनकांबळे यांनी महसूल मंत्र्यांकडे केली आहे.

# एचआयव्ही बाधितांशी भेदभाव करु नका : डॉ. मोरे

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. ६ डिसेंबर-**

एडस, एचआयव्ही बाधित व्यक्तिंशी, रुग्णांशी मानवतावादी दृष्टिकोनातून वागा, विशेष करुन एचआयव्ही बाधितांना धिर दिला पाहिजे, अश्या एडस सप्ताहनिमित्त रली, कार्यक्रम, जनजागृती,व प्रबोधन करण्याची आज आवश्यकता आहे. एडस बाधित व्यक्तिंशी भेदभाव करु नका असे आवाहन प्रभारी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डा. विजयकुमार मोरे यांनी केले.

जागतिक एडस सप्ताहनिमित्त उपजिल्हा रुग्णालय व अल ईम्रान प्रतिष्ठान बिलोली यांच्या संयुक्त विद्यमाने दि.६ डिसेबर २०२५ रोजी शनिवारी दुपारी ११: ३० वाजता आयोजित कार्यक्रमात



डा.मोरे बोलत होते.या रलीसाठी उपस्थित सर्वांना अल ईम्रान प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डा.मोहसीन खान यांनी एडस विरोधाची शपथ दिली. उपजिल्हा रुग्णालयापासून, गांधी चौक ते जुना बसस्टँड ते परत उपजिल्हा रुग्णालय अश्या मुख्य रस्त्याने एड्स विरोधी जनजागृती रॅली काढण्यात आली.या एडस जनजागृती रलीस उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ्. विजयकुमार मोरे यांच्या हस्ते हिरवा ध्वज दाखवून फेरीस सुरूवात करण्यात आली.

आयटीआय कालेज चे विद्यार्थ्यांनी या फेरीत हातात फलक,बॅनर घेऊन सहभाग नोंदविला होता. विविध घोषवाक्यांनी रॅली दणाणून गेली. यावेळी डॉ.तन्जिल बेग, डा. शिवकुमार सावरगावे, डा.समरिन शेख, डॉ.अक्षय गायकवाड यांच्यासह अश्विनी पाटील, विद्या पवार, सरस्वती गायकवाड, वर्षा काशिदे, आयटीआय चे ईन्स्ट्रक्टर सोंनकांबळे ए.एन, हुलसुरे एस. एम, संगमवार एस वाय सह सर्व नर्स,स्टाफ आदिंची उपस्थिती होती. रॅलीत एपपीडब्ल्यु नागनाथ पवार,रुपाली कंडेवाड, अश्विनी पाखरे, मिनाक्षी उराडे, दिनेश तळणे, १०२ च्या रुग्णवाहिकेचे चालक महेश हळीखेडे अदिंनी सहभाग नोंदवला.एडस रॅली यशस्वी करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाच्या आयसीटीसी विभागाचे समुपदेशक देविदास भोईवार,लिंक वर्कर किनाळकर ए एच यांनी परिश्रम घेतले.शेवटी उपस्थितांचे आभार अल ईम्रान प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.मोहसीन खान यांनी मानले.

# रंगभरण चित्रकला स्पर्धेतून महामानवास अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ६ डिसेंबर-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिन जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत अभिवादन कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षिका संगिता बडवणे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार, सहाय्यक पोलीस निरीक्षक फड, जोगदंड, माजी सरपंच साहेबराव शिखरे, अंकुश पाटील शिखरे, मारोती शिखरे, तंटामुक्ती अध्यक्ष मिलिंद गोडबोले, मारोती चक्रधर, हरिदास पांचाळ, इंदिरा पांचाळ, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले, माजी अध्यक्ष किशनराव गच्चे, समता सैनिक दलाचे गुणवंत गच्चे, आनंद गोडबोले, केशव गोडबोले, मनिषा गच्चे, विलास गोडबोले, सूरज गोडबोले आदींची उपस्थिती होती.

रंगभरण चित्रकला स्पर्धे च्या सुरवातीला मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. स्पर्धेचे आयोजनासाठी शालेय बालसभेच्या सोनल गोडबोले, तेजल शिखरे, मयुरी गोडबोले, अनन्या टिमके, सुप्रिया गच्चे, शाहेद शेख, सिद्धांत गोडबोले, विश्वदीप झिंझाडे, पिरखाँ पठाण, दीपक शिखरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात शाळेच्या इयत्ता पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा! च्या गजराने दत्तजन्मभूमीगडासह अवघी माहूरनगरी दुमदुमली !

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ६ डिसेंबर-**

गुरुवार, दिनांक ०४ डिसेंबर (पौर्णिमा) रोजी माहूर गडावरील श्री दत्तात्रेय संस्थान येथे दत्तजयंतीनिमित्त भाविकांची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली. हातात निशाण, मुखी दत्ता दिगंबरा देवा दत्ता दत्ताचा जयघोष या गजराने माहूरगड येथील दत्तजन्मभूमीगडासह अवघी माहूरनगरी अक्षरशः दुमदुमून गेली. लगतच्या जिल्ह्यांसह राज्यभरातून भाविकांनी २ डिसेंबरपासूनच मोठ्या संख्येने हजेरी लावत दत्तजन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने उत्साहात साजरा केला.

तत्पूर्वी काल बुधवारी (दि.०३) रोजी दत्तजयंतीनिमित्त गडावरील दत्तशिखर संस्थान येथे भगवान श्री दत्तप्रभूंचा जन्मसोहळा भक्तिभावात संपन्न झाला. गडाचे परमपूज्य



श्री श्री १००८ महंत मधुसूदन भारती महाराज

यांच्या शुभहस्ते दुपारी २ वाजता श्री भगवान दत्तात्रेय प्रभु यांचा अभिषेक,समाधीपूजन करत सभामंडपात जन्मसोहळ्यास सुरुवात झाली. पोथीवाचन करण्यात आले. या दत्त जन्माचे अध्याय वाचन ब्रह्मवृंद ऋषिकेश जोशी यांनी केले.

यावेळी मुख्य पुजारी वासुदेव भारती महाराज यांच्यासह चिरंजीव भारती,हरिहर भारती,सुजान भारती, नितेश भारती,माधव गिरी, विलासराव जोशी,रवींद्र जोशी, विकास जोशी तसेच साधुसंत व उत्सव मंडळी उत्साहात सहभागी झाले होते.

यावेळी भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. किर्तनकार पुसदकर महाराज यांचे किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी दत्तगडावर भगवान दत्तात्रेय प्रभु यांच्या जयंतीनिमित्त गडावर उपस्थित लाखों भाविकांच्या सोयीसाठी श्री दत्तात्रेय शिखर संस्थानकडून दत्त जन्म सोहळा लाइव्ह पाहता यावा यासाठी जागोजागी भव्य एलईडी स्क्रीन व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी संस्थानचे सचिव ठेंगे पाटील व व्यवस्थापक नाईक हे बारकाईने लक्ष ठेवून आपल्या कर्मचाऱ्यांसह परिश्रम घेत होते. तर गुरुवारी श्री दत्तजयंतीनिमित्त भाविकांच्या सोयीसाठी ग्रामसेवक संघटना, पंचायत समिती कर्मचारी, विविध सामाजिक संस्था व नागरिकांच्या वतीने मोफत महाप्रसादाचे अनेक स्टॉल उभारण्यात आले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथेही हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. माहूरच्या साईनाथ महाराजांच्या आनंद दत्त नाम मठ तसेच श्री आनंद दत्तधाम आश्रमात यंदाही पुरणपोळी व आम्ररस प्रसादाची परंपरा कायम ठेवत भाविकांसाठी महाप्रसादाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. एकूणच असेच म्हणावे लागेल कि,यावर्षीच्या दत्त जयंतीच्या यात्रोत्सवात श्री दत्तात्रेय प्रभु यांची जन्मभूमी ,तपोभूमी श्री अनुसया माता मंदिर, दत्त शिखर मंदिर, शहरातील महानुभाव पंथाचे मंदिर असलेले श्री दत्तात्रेय प्रभु यांचे निद्रास्थान असलेल्या श्री देवदेवेश्वर संस्थानचे यासह श्री रेणुका देवी मंदिर आणि शेकडो मठ, आश्रम हे लाखों दत्तभक्तांच्या उपस्थितीने देवा दत्ता दत्ता,देवा दत्ता दत्ता ! च्या नामस्मरणात तल्लीन होऊन दिगंबरा दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा! च्या दत्त गजराने दुमदुमून गेली आहे.